



# दैनिक धर्मयोध्दा

मातीशी इमान राखणारे...
सत्यासाठी लढणारे...

संपादक :- रामेश्वर गणपतराव शिंदे मो. नं.९४२१४७९८८१
MAHMAR/2023/90786
dharmaayoddha@gmail.com

* परभणी * वर्षे ३ रे * अंक ९५ * गुरूवार दि. ११ सप्टेंबर २०२५, * पाने ४ * किंमत ३ रुपये

* PARBHANI *YEAR 3 * ISSUE 95 *WEDNESDAY 11 SEPTEMBAR 2025 * PAGES 4 * RS 3


## परदेशातील उद्योगांना आवश्यक कुशल मनुष्यबळ पुरवण्यात महाराष्ट्र अग्रेसर राहील - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**मुंबई -** परदेशातील उद्योगांना आवश्यक कुशल मनुष्यबळाची गरज लक्षात घेवून त्यानुसार अभ्यासक्रमांचा प्रशिक्षणात समावेश करावा. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थाबरोबरच खासगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थासाठीही एक सक्षम यंत्रणा तयार करण्यात यावी. आयटीआयमार्फत राबविण्यात येणारे अल्पकालीन अभ्यासक्रम अधिक प्रभावीपणे राबवा. प्रशासनमार्फत केलेल्या सर्व सामंजस्य करारांचा आढावा सीएम डॅशबोर्डवर घेण्यात यावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या आढावा बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. अपूर्वा पालकर, मुख्यमंत्री कार्यालयाच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, सचिव श्रीकर परदेशी, आयुक्त लहूराज माळी, व्यवसाय व शिक्षण प्रशिक्षण संचालनालयाच्या संचालक माधवी सरदेशमुख यासह विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की, परदेशात आज कुशल मनुष्यबळाची आवश्यकता आहे हे लक्षात घेवून या विभागाने काळानुरूप आवश्यक असे अभ्यासक्रम सुरू करावेत. रोजगार वाढीसाठी करण्यात आलेल्या सामंजस्य कराराची अंमलबजावणी करण्यासाठी सक्षम यंत्रणा तयार करावी. एखाद्या व्यक्तीने कौशल्य अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यापासून ते अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंतची सर्व माहिती डिजिटली पद्धतीने तपासली जावी. शासकीय आयटीआय जागतिक दर्जाच्या कौशल्य केंद्रात रूपांतरीत करण्यासाठी आवश्यक त्या सुधारणा करण्यात याव्या. 'मित्रा'संस्थेकडूनही मार्गदर्शन घेण्यात यावे, असे निर्देशही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिले.


**जास्तीत जास्त उद्योजक तयार करणार : कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा**

कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना तसेच उपक्रमांची माहिती दिली. आयटीआयमध्ये सौर तंत्रज्ञ, इलेक्ट्रिक वाहन मेकॅनिक, डिटिव्ह मॅन्युफॅक्चरिंग (३ऊ प्रिंटिंग), ड्रोन तंत्रज्ञ, औद्योगिक रोबोटिक्स, एआय प्रोग्रामिंग असिस्टंट असे अभ्यासक्रम सुरू करण्यात येतील. शहरी, ग्रामीण व आदिवासी भागासाठी त्यांच्या गरजावर आधारित अभ्यासक्रम तयार करण्यात येतील असेही श्री.लोढा यांनी यावेळी सांगितले.

अपर मुख्य सचिव मनिषा वर्मा यांनी विभागाची रचना, योजना व सद्यस्थितीची माहिती सादरीकरणातून दिली. विभागातील नाविन्यपूर्ण उपक्रम, यशोगाथा याची देखील सविस्तर माहिती दिली.

यावेळी महिंद्रा ण्ड महिंद्रा कंपनीसोबत व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाने विविध प्रशिक्षणासाठी सामंजस्य करार केला. महिन्द्रा ण्ड महिन्द्रा लिमीटेडचे प्रमुख प्रफुल्ल पांडे आणि महिंद्रा ण्ड महिंद्रा शिक्षण विभागाचे प्रमुख डॉ. लेविस यावेळी उपस्थित होते.

## देशाच्या उपराष्ट्रपतीपदी निवड झाल्याबद्दल सी.पी. राधाकृष्णन यांचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून अभिनंदन



**मुंबई -** देशाचे उपराष्ट्रपती म्हणून राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे उमेदवार श्री. सी. पी. राधाकृष्णन विजयी झाले आहेत. संसदीय परंपरा अधिक सक्षम करण्यासाठी, संविधानिक मूल्यांचे रक्षण करण्यासाठी व लोकशाही बळकट करण्यासाठी उपराष्ट्रपतींची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. श्री. सी. पी. राधाकृष्णन यांच्या अनुभवाचा देशाला निश्चितच लाभ होईल, असा विश्वास व्यक्त करत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार आपल्या संदेशात म्हणतात की, श्री. राधाकृष्णन हे महाराष्ट्राचे राज्यपाल म्हणून कार्यरत राहिले आहेत. त्यामुळे उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत त्यांचा झालेला विजय ही महाराष्ट्रासाठी अभिमानाची व आनंदाची बाब आहे. श्री. राधाकृष्णन यांचा हा विजय 'एनडीए'च्या एकजुटीचा आणि लोकांच्या केंद्र सरकार वरील विश्वासाचा, भारतीय संविधानाच्या मूल्यांचा विजय आहे. देशातील लोकशाही संस्थांचे सक्षमीकरण करण्यासाठी ते निश्चितच योगदान देतील, असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला आहे.

## ताडकळस पोलिसात अल्पवयीनावर चोरीचा गुन्हा दाखल

**(वजीर पठाण/दै.धर्मयोध्दा)**

**ताडकळस :** ताडकळस येथील नवा मोंढा येथील फिर्यादीच्या घरासमोर लावलेल्या ट्रक्टर वरील साहित्य व व्यापारी गणेश मंडळांच्या मंडपावर टाकलेली लाइटिंग तसेच मोटरसायकलची बॉटरी चोरुन नेल्याची घटना सोमवारी (दि.= रात्री ११ ते मंगळवारी सकाळी ५ वाजण्याच्या दरम्यान उघडकीस आली. याप्रकरणी अल्पवयीन बालकावर ताडकळस पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ओमकार अनिल शिंदे (वय १५) रा. नवामोंढा ताडकळस याने सोमवारी रात्री ११ ते मंगळवारी सकाळी ५ वाजण्यादरम्यान फिर्यादीच्या घरासमोर लावलेली ट्रक्टरवरील टेप तसेच गणेश मंडळ मंडपावरील लाइटींग, मोटार सायकलची बॅटरी असा एकूण ७ हजार ३०० रूपयांचा मुद्देमाल चोरल्याची फिर्याद प्रल्हाद भगवानराव रेंगे यांनी ताडकळस पोलिसात दिली आहे. यावरून ताडकळस पोलिसात अल्पवयीन बालकावर गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास ताडकळसचे ठाणेदार गजानन मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस उपनिरिक्षक नामदेव सुजलोड हे करीत आहेत.

## पुर्णा तालुकाध्यक्षपदी शहाजीराव देसाई यांची निवड

**(असद शेख/दै.धर्मयोध्दा)**



**पुर्णा -** राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा पवार गट) पक्षाच्या वतीने पुर्णा तालुक्यातील सक्रिय कार्यकर्ते तसेच पुर्णा सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष शहाजीराव देसाई यांची तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. सोमवारी (ता. ८ सप्टेंबर २०२५) पक्षाचे जिल्हाध्यक्ष तथा आमदार राजेशदादा विटेकर यांनी शेकडो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत त्यांना नियुक्ती पत्र प्रदान केले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आणि प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांच्या आदेशानुसार आमदार राजेश विटेकर यांनी जिल्ह्यातील काही पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर केल्या. त्यानुसार शहाजीराव देसाई यांच्यावर पुर्णा तालुकाध्यक्षपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षबांधणीसाठी ही निवड महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यालयात आयोजित कार्यक्रमात आमदार राजेश विटेकर यांनी देसाई यांना नियुक्ती पत्र दिले. यावेळी आबासाहेब पवार, अंकुशराव शिंदे, गजाननराव धवन, शंकरराव नवघरे, रघुनाथ डाखोरे, श्रीधरराव पारवे, शिवाजीराव डाखोरे, गोरखनाथ साखरे, माऊली वानखेडे, पंढरीनाथ ढोणे, डी.एन. किरगे, आनंद जोगदंड, बाबुराव सोनटक्के, कुंडलिक कदम यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. शहाजीराव देसाई यांच्या निवडीने पुर्णा तालुक्यातील कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत असून, कार्यकर्त्यांनी आनंदाचा जल्लोष व्यक्त केला आहे.

## अंबड उपजिल्हा रुग्णालयात मनमानी कारभार; डिलेव्हरीसाठी 'फिक्स दोन हजार'चा रेट

**(रामदास पाटेकर/ दै.धर्मयोध्दा)**




**अंबड -** शहरातील उपजिल्हा रुग्णालयात डिलेव्हरीसाठी आलेल्या महिला तसेच त्यांच्या नातेवाईकांकडून बेकायदेशीरपणे दोन हजार रुपये घेतल्याशिवाय डिलेव्हरी केली जात नाही, असा धक्कादायक आरोप अंबड तालुक्यातील लखमापुरी येथील रामकिसन नानाभाऊ यांनी जिल्हा परिषदेला तक्रार अर्जात म्हंटले आहे.

दिलेल्या तक्रार अर्जात म्हंटले आहे कीं, शनिवार दि. ५ सप्टेंबर रोजी प्रसूतीसाठी अंबड येथील उपजिल्हा रुग्णालय येथे दाखल केले. त्यावेळी संध्यकाळ पर्यंत डिलेव्हरी होईल असे सांगण्यात आले. व त्यानंतर सकाळी होईल असे सांगण्यात आले. मात्र सकाळी ११ वाजेपर्यंत रुग्णाला तीव्र त्रास होत असतानाही योग्य माहिती देण्याऐवजी नातेवाईकांशी अरेरावी करण्यात आली. आणि नंतर २ हजार रुपयांची मागणी करण्यात आली. आणि विशेष बाब म्हणजे पैसे देताच अवघ्या अर्ध्या तासात डिलेव्हरी पूर्ण करण्यात आल्याचा आरोप तक्रारदारांकडून करण्यात आला आहे.

**रुग्णालयात मूलभूत सुविधांचा अभाव.....**

उपजिल्हा रुग्णालयातील शौचालये बंद अवस्थेत आहेत, पिण्याच्या पाण्याची सोय नाही, कर्मचारी ड्रेस कोड किंवा आयडी कार्डशिवाय वावरतात, कोण डॉक्टर आणि कोण कर्मचारी हे देखील ओळखता येत नाही, शिवाय रुग्णांना आणण्या-नेण्यासाठी एकच म्ब्युलन्स असून ती देखील वेळेवर उपलब्ध होत नाही.

रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. सुरमवाड यांचे कर्मचारी वर्गावर नियंत्रण नसल्याची चर्चा सुरु आहे.उपजिल्हा रुग्णालयात होत असलेल्या अनधिकृत वसुलीबाबत माहिती असल्याचा संशय तक्रारदारांकडून व्यक्त करण्यात आला आहे. तसेच पाच रुग्णांच्या नातेवाईकांनी अशाच प्रकारचा अनुभव सांगितला असल्याचेही म्हंटले आहे.

अंबड उपजिल्हा रुग्णालयातील या कारभारामुळे जनतेमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून, या रुग्णालयाला कोणी वाली आहे काय? असा सवाल नागरिक करत आहेत. याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तात्काळ चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

## सेवा पंधरवडा २०२५ निमित्त भाजपा परभणी महानगर जिल्हा कार्यशाळा संपन्न



**परभणी -** देशाचे लाडके पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टीतर्फे 'सेवा पंधरवडा' आयोजित करण्यात आला आहे. हा उपक्रम १७ सप्टेंबर (मोदीजींचा वाढदिवस) पासून सुरू होऊन २ ऑक्टोबर (महात्मा गांधी जयंती) पर्यंत राज्यभरात तसेच भाजपा परभणी महानगर जिल्ह्यात राबविण्यात येणार आहे.

या उपक्रमाच्या तयारीसाठी भाजपा परभणी महानगरच्या वतीने सावली विश्रामगृह येथे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेला मराठवाडा संघटन मंत्री संजयजी कोडगे यांची विशेष उपस्थिती लाभली.

कार्यशाळेत ज्येष्ठ नेते तथा माजी मंत्री सुरेशराव वरपुडकर, माजी ग्रामीण जिल्हाध्यक्ष संतोष मुरकुटे, भाजपा परभणी महानगर जिल्हाध्यक्ष शिवाजीराव भरोसे, प्रदेश कार्यकारिणी सदस्य मोहनभाई कुलकर्णी, राजेशजी देशपांडे, संजयराव शेळके, सरचिटणीस ड. एन. डी. देशमुख, भालचंद्र गोरे, शंकर आजेगावकर, मंगल मुदगलकर, नगरसेवक रितेश जैन, मधुकर गव्हाणे, मोकिंद खिल्लारे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष अजिंक्य गोंडेस्वार, महिला जिल्हाध्यक्ष मनीषा जाधव, ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष गणेश टाक, मंडळाध्यक्ष मधुसूदन जोशी, सूरज चोपडे, दैवत लाटे, स्वप्नील पिंगळकर, ऋतुजा जोशी, अनुजाती मोर्चा जिल्हाध्यक्ष सुमित भालेराव आदींसह भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यशाळेत सेवा पंधरवड्यात राबविण्यात येणाऱ्या रक्तदान शिबिरे, वृक्षारोपण, आरोग्य तपासणी शिबिरे, विचारवंत (प्रबुद्ध), दिव्यांग व्यक्तींचा सन्मान, वकृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, मॅरेथॉन, वोकल फोर लोकल, प्रदर्शन, स्वच्छता मोहिमा, गरजूंसाठी सहाय्य उपक्रम अशा समाजोपयोगी कार्यक्रमांबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. बूथ प्रमुख, शक्ती केंद्र प्रमुख तसेच पदाधिकाऱ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवला.

भाजपाचा 'सेवा पंधरवडा' उपक्रम हा केवळ सेवा कार्यापुरता मर्यादित नसून, समाजातील दुर्बल घटकांपर्यंत मदत पोहोचविण्याचा आणि सेवा भाव जागविण्याचा संकल्प असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

## पूर्णा तालुक्यातील पेट्रोल पंपावरील सुविधांचा अभाव; ग्राहक पंचायतचे प्रशासनाला निवेदन

**(असद शेख /दै.धर्मयोध्दा)**




**पुर्णा-** शहरासह तालुक्यातील पेट्रोल पंपांवर आवश्यक सुविधांचा अभाव, ऑनलाइन पेमेंट स्वीकारण्यास नकार आणि ग्राहकांची फसवणूक होत असल्याच्या गंभीर तक्रारींवर अखिल भारतीय ग्राहक पंचायत, पूर्णा शाखेने तहसील कार्यालयात पुरवठा अधिकाऱ्यांना ९ सप्टेंबर २०२५ रोजी निवेदन सादर केले. निवेदनात नमूद केल्यानुसार, शासन आणि तेल कंपन्यांच्या निर्देशांनुसार प्रत्येक पेट्रोल पंपावर स्वच्छ पिण्याचे पाणी, स्वतंत्र शौचालये, मोफत हवा भरण्याची सुविधा, अद्ययावत इंधन दरफलक, मोजमाप यंत्र, तक्रार निवारण पुस्तिका, हेल्पलाइन क्रमांक, परिसर स्वच्छता, प्रकाश व्यवस्था, अग्निशामक यंत्र आणि डिजिटल पेमेंट सुविधा अनिवार्य आहेत. मात्र, अनेक पंपांवर हवा भरण्याची मशीन बंद, शौचालये अस्वच्छ किंवा बंद, पिण्याचे पाणी अनुपलब्ध, दरफलक जुने, तक्रार पुस्तिका नसणे आणि स्वच्छता व प्रकाश व्यवस्थेचा अभाव आढळतो. सर्वात गंभीर बाब म्हणजे, अनेक पंपचालक ग्राहकांकडून णझख, टठ कोड किंवा कार्डद्वारे पेमेंट स्वीकारण्यास नकार देतात आणि रोख रक्कम नसल्यास ग्राहकांना परत पाठवतात. हा प्रकार शासनाच्या डिजिटल इंडिया धोरणाच्या विरोधात असून ग्राहकांचा अपमान करणारा आहे, असे निवेदनात म्हटले आहे.

ग्राहक पंचायतच्या प्रमुख मागण्या: १)पूर्णा तालुक्यातील सर्व पेट्रोल पंपांची तात्काळ तपासणी. २) ऑनलाइन पेमेंट नाकारणाऱ्या आणि सुविधा न देणाऱ्या पंपांवर कठोर कारवाई. ३) नियमांचे पालन न करणाऱ्या पंपांचे परवाने रद्द करणे. ४) ग्राहकांना परत पाठवणाऱ्या पंपचालकांविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करणे. ५) सर्व पंपांवरील सुविधांची नियमित तपासणी. निवेदन शहराध्यक्ष सय्यद सलिम सुहागनकर, उपाध्यक्ष सुशिल गायकवाड, सचिव नारायण सोनटक्के, सदस्य मनोज भुजबळ, शेख निशांत, संजय पांचाळ आणि शीलवंत भराडे यांनी सादर केले. या निवेदनामुळे पेट्रोल पंपांवरील गैरप्रकारांविरुद्ध कारवाईची मागणी जोर धरू लागली आहे. नागरिकांनी प्रशासनाने तातडीने पावले उचलून न्याय द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

## संपादकीय...

# भारतातील संघराज्य रचनेत राज्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे

राष्ट्रपतींनी अनुच्छेद १४३ अंतर्गत सर्वोच्च न्यायालयाकडून सल्ला मागविल्यावर आपले मत कळविण्याकरता सर्वोच्च न्यायालयाला अनिश्चित कालावधी घेता येईल का? एखाद्या खटल्यात सुनावणी पूर्ण झाल्यानंतर, राखून ठेवलेला निर्णय जाहीर करण्यासाठी न्यायालयाला अनिश्चित कालावधी घेता येईल? आणि जर या प्रश्नांचे उत्तर 'नाही' असेल तर मग विधिमंडळात वा संसदेत मंजूर करण्यात आलेल्या विधेयकास मान्यता किंवा नकार देण्यासाठी राज्यपाल किंवा राष्ट्रपतींना अनिश्चित कालावधी घेता येईल का? असे प्रश्न न्यायालयाने केंद्र सरकारच्या वकिलांना विचारायला हवेत.

हे प्रश्न याकरिता विचारायला हवेत, कारण राज्य घटनेत राष्ट्रपतींनी अनुच्छेद १४३ अंतर्गत सल्ला मागविल्यावर मत कळविण्यासाठी किंवा सुनावणी पूर्ण झाल्यानंतर राखून ठेवलेला निकाल जाहीर करण्याकरिता वेळेचे कोणतेही बंधन दिलेले नाही. तसेच विधिमंडळाने/संसदेने मंजूर केलेल्या विधेयकांच्या मान्यतेसाठी राज्यपाल व राष्ट्रपतींसाठी कोणतीही कालमर्यादा राज्य घटनेत नमूद नाही. उपरोक्त मुद्दे उपस्थित करण्याचे कारण म्हणजे, सध्या सर्वोच्च न्यायालयात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी तमिळनाडू सरकार विरुद्ध राज्यपाल या खटल्यात न्यायालयाने दिलेल्या निकालाच्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाकडे २०० आणि २०१ संदर्भातील संवैधानिक चिंता व्यक्त करणाऱ्या १४ प्रश्नांच्या अनुषंगाने सुनावणी सुरू आहे.

सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या अध्यक्षतेखालील न्या. सूर्यकांत, न्या. विक्रम नाथ, न्या. पी.एस. नरसिंह आणि न्या. अतुल सरन यांचा सहभाग असलेल्या खंडपीठात सुरू असलेल्या या सुनावणीत पुढील मुद्दे केंद्रस्थानी आहेत. १) कलम २०० अंतर्गत राज्यपालांच्या संवैधानिक शक्ती व मर्यादा काय आहेत? २) कलम २०० व २०१ अंतर्गत न्यायालयीन हस्तक्षेप शक्य आहे का? ३) जिथे राज्य घटनेत वेळमर्यादा अथवा प्रक्रिया दिलेली नाही, तिथे न्यायालय संवैधानिक शक्तींवर नियंत्रण ठेवू शकते का? ४) सर्वोच्च न्यायालयाच्या सल्लागार आणि घटनात्मक अधिकारक्षेत्राची व्याप्ती काय आहे? ५) राज्य विधेयक कधी कायदा बनते, व न्यायालय त्यात हस्तक्षेप करू शकते का? ६) अनुच्छेद १४२ अंतर्गत सर्वोच्च न्यायालयाने राज्यपाल/राष्ट्रपतींच्या विवेकाधिकारांची जागा घेतली आहे का? अनुच्छेद २००नुसार, राज्य विधिमंडळाने मंजूर केलेले विधेयक राज्यपालांकडे सादर केल्यावर राज्यपाल पुढीलपैकी कुठलाही निर्णय घेऊ शकतात: (अ) विधेयक मंजूर करणे, (आ) मंजुरी नाकारणे, (इ) राष्ट्रपतींच्या विचारार्थ ते राखून ठेवणे, (ई) विधेयक (अर्थविधेयक वगळून) पुन्हा विचारासाठी विधिमंडळाकडे परत पाठवणे. परंतु, विधेयक पुन्हा विधिमंडळात मंजूर झाल्यास राज्यपालांना ते नाकारता येत नाही. राज्यपालाच्या मते, जर त्या विधेयकाचे कायद्यात रूपांतर होऊन त्याचा परिणाम उच्च न्यायालयाच्या अधिकारांवर होणार असेल, किंवा त्याची वैधता शंकास्पद असेल, तर ते विधेयक ते राष्ट्रपतींच्या विचारार्थ राखून ठेवू शकतात. राज्यपालांनी विधेयक राष्ट्रपतींकडे विचारार्थ पाठवले, तर अनुच्छेद २०१नुसार राष्ट्रपती त्यास मान्यता देऊ शकतात किंवा नाकारू शकतात किंवा पुनर्विचारार्थ राज्याकडे पाठवू शकतात.

घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्पष्ट सांगितले होते की, राज्यपालांची भूमिका ही सल्लागाराची आहे आणि त्यांची विवेकाधिकारांची व्याप्ती फारच मर्यादित आहे. टी. टी. कृष्णमाचारी यांनी असेही स्पष्ट केले होते, की विधेयक परत पाठविण्याचा अधिकार हा मंत्रिमंडळाच्या सल्ल्यावर आधारित असावा. राज्यपाल हे राज्याचे घटनात्मक प्रमुख असले तरी, ते मंत्रिमंडळाच्या सल्ल्यावर कार्य करण्यास बांधील आहेत. (अनुच्छेद १६३). राज्यपाल किंवा राष्ट्रपतींनी विधेयक मंजूर करावे, नाकारावे किंवा परत पाठवावे यासाठी कोणतीही निश्चित अशी वेळमर्यादा घटनेत दिलेली नाही. त्यामुळेच प्रश्न निर्माण होतो की, जनतेने निवडून दिलेल्या सरकारच्या कामात विलंब होऊ नये याकरता विशिष्ट वेळेत निर्णय घेण्याचे बंधन त्यांच्यावर असावे का?

भारतातील संघराज्य रचनेत राज्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. राज्यांना जनतेच्या हिताकरिता कायदे करण्याचे अधिकार घटनेतूनच मिळालेले आहेत. घटनेतील अनुच्छेद २४५ ते २५४ हे कायदे बनवण्याच्या अधिकाराचे वाटप स्पष्ट करतात. राज्य विधिमंडळाला सातव्या अनुसूचीमध्ये दिलेल्या मुख्यतः राज्य यादीतील विषयांवर कायदे करण्याचा अधिकार असतो. समवर्ती यादीतील विषयांवर संसदेसोबत अधिकार सामायिक असतो. विधिमंडळात मंजूर विधेयक, राज्यपालांनी मंजुरी दीर्घ काळ प्रलंबित ठेवल्यामुळे सरकारच्या पाच वर्षाच्या कालावधीत कायद्यात रूपांतरित होत नसेल तर ते विधिमंडळाच्या कायदे करण्याच्या अधिकारात अडथळा ठरत नाही का?

राज्य विधानसभेचे सार्वभौमत्व तितकेच महत्त्वाचे आहे जितके संसदचे. विधिमंडळातील मंजूर विधेयक हे लोकांच्या इच्छेचे प्रतीक असते. यात तातडीचा घटक आहे, त्यामुळे ते तातडीने लागू केले पाहिजे. जनतेची इच्छा कार्यपालिकेच्या मनमानीवर सोडता येत नाही. राज्यपालांनी केवळ वैयक्तिक राजकीय मतांमुळे, धोरणात्मक मतभेद किंवा केंद्र सरकार भविष्यात त्या विषयावर कायदा करील, या अपेक्षेने विधेयक रोखू नये. मंत्रिमंडळाचा सल्ला न जुमानता निर्णय घेणे त्यांनी टाळले पाहिजे. राष्ट्रपतींकडे विधेयक पाठवण्याचा निर्णय त्यांनी अत्यावश्यक आणि विशिष्ट बाबींमध्येच घेतला पाहिजे.

आत्ताच्या अनुच्छेद १४३ अन्वये, राष्ट्रपतींकडून आलेल्या प्रकरणाच्या सुनावणीच्या माध्यमातून सर्वोच्च न्यायालय आपला तमिळनाडू प्रकरणात एप्रिल महिन्यात दिलेला निर्णय बदलवू शकेल का? तर त्याचे उत्तर 'नाही' असेच आहे. पूर्वीचे निर्णय रद्द किंवा बदलायचे असल्यास, त्यासाठी घटनात्मक पुनरावलोकन, सर्वोच्च न्यायालयाची स्वतःची पुनरावलोकन प्रक्रिया किंवा क्युरेटिव्ह याचिका हेच मार्ग आहेत. अनुच्छेद १४३चा वापर करून आधीचे निर्णय बदलणे न्यायिक अधिकाराच्या मर्यादा ओलांडणारे ठरेल आणि कार्यपालिका व न्यायपालिका यांच्यातील विभाजन धोक्यात येईल. या पार्श्वभूमीवर आता सर्वोच्च न्यायालय काय निर्णय घेते ते बघायचे.

# एकत्र कुटुंब पद्धती अस्तित्वात ठेवणे काळाची गरज!

एकेकाळी घरोघरी एकत्र कुटुंब पद्धत अस्तित्वात होती. त्यामुळे घरोघरी सुखी, समाधानी व आनंदी वातावरण पाहायला मिळायचे. एकमेकांच्या मदतीला धावून जाणे, एकमेकांना आर्थिक मदत करणे, एकमेकांच्या सुखदुःखात धावून जाणे आणि एकमेकांना मायेने व आपुलकीने बोलणे हे सारे एकत्र कुटुंब पद्धतीत आपल्याला प्रकर्षाने पाहायला मिळायचे. त्याकाळी सख्ख्या भावांमध्ये प्रेम, माया व आपुलकी ठासून भरलेली होती. म्हणून तेव्हा भावंडांमध्ये कधीच आताच्या एवढे वाद-विवाद होत नव्हते. भाऊ भावाचा मनःपूर्वक आदर करत होता. एका भावावर संकट आले तर दुसरा भाऊ वाऱ्याच्या वेगाने धावून आपल्या भावाला आधार द्यायचा. एका भावाला दुःख झाले तर दुसऱ्या भावाला अतोनात वेदना व्हायच्या. छोटा भाऊ मोठ्या भावाचा आदर राखायचा. मोठ्या भावाचा विचार घेऊनच छोटा भाऊ पुढील वाटचाल करायचा. एकत्र कुटुंब पद्धत अस्तित्वात असल्यामुळे आई वडील व आजी आजोबा यांचे एकत्र कुटुंबात मोलाचे योगदान असायचे. आई-वडिलांमुळे व आजी आजोबांमुळे लहान मुलांवर संस्काराची पेरणी अतिशय चांगल्या पद्धतीने व्हायची. एकत्र कुटुंब पद्धतीमुळे एकमेकांबद्दल असणारा मायेचा ओलावा आणि एकमेकांबद्दल असणारी प्रेमाची व आपुलकीची भावना ही ठळकपणे दिसायची. लहान मुले व नातवंड आजी आजोबांच्या संस्कार छायेखाली लहानाचे मोठे व्हायचे. आजी आजोबा देखील त्यांना जिवापाड जपायचे. एकत्र कुटुंब पद्धतीमुळे शेती सुद्धा एकत्र केली जायची. त्यामुळे शेतीमध्ये शेतमाल भरमसाठ व्हायचा. शेतीमध्ये आलेली बरकत पाहून शेतकरी आनंदात न्हाऊन निघायचे. एकत्र कुटुंब पद्धतीमुळे प्रत्येक घरात व कुटुंबात एकमेकांबद्दल प्रेम, माया, आपुलकी व जिव्हाळा



जणू काय मानवतेचा संदेश देत होता. घरोघरी माया, ममता व मानवता आनंदाने व सुखाने नांदत होती. एकत्र कुटुंब पद्धतीचा फायदा असा व्हायचा की, घरातील ज्येष्ठांना म्हणजेच वृद्ध आई-वडिलांना घराबाहेर काढून वृद्धाश्रमाचा रस्ता दाखवणारे महाभाग एकत्र कुटुंब पद्धतीत अस्तित्वात नव्हते. कारण एकत्र राहिल्यामुळे माणसांमध्ये एकमेकांबद्दल प्रेम भावना वाढीस लागते. एकमेकांबद्दल लळा लागतो आणि त्यांच्यातील असलेले नातेसंबंध अधिक घट्ट होऊन ते वेळप्रसंगी एकमेकांवर जीव ओवाळून टाकायला सुद्धा तयार होतात. एकत्र कुटुंब पद्धतीमुळे आपल्या घरावर वाईट नजरेने बघायची कोणाची हिंमत सुद्धा होत नाही. कारण एकत्र कुटुंब पद्धती एकीचे दर्शन घडवते. पण असे एकीचे दर्शन घडवणारी एकत्र कुटुंब पद्धती हल्ली कुठेच अस्तित्वात राहिली नाही. हीच या देशाची खरी शोकांतिका आहे. एकेकाळी एकत्र असणारे कुटुंब आता विभक्त झाले आहे. कारण काळानुसार माणसांमध्ये बदल होत गेला, माणसांची नीतिमत्ता बदलली, माणूस स्वार्थी व लोभी बनला. स्वतःसाठी आणि बायको मुलांसाठी जगणे हेच त्याचे जीवन ध्येय बनले आहे. म्हणजे आजकालचा माणूस आपल्याच बायको मुलांत गुरफटून गेला आहे. त्याला घरातील सदस्य म्हणजेच आई वडील, बहिण भाऊ, आजी आजोबा आणि समाजबांधव यांचा काहीही संबंध राहिलेला नाही. फक्त आपणच कसे मोठे व्हावे आणि आपल्याच जवळ सर्वात जास्त पैसा व संपत्ती कशी गोळा होईल हा विचार आजकालचा प्रत्येक माणूस करत आहे. म्हणतात ना चुलता, भाऊ, बहिण, आई वडील आणि आजी आजोबा हेच आपले असतात. पण आपली बायको व भावाची बायको ही आपली नसते. हे कदाचित खरे आहे, कारण यांच्यासोबत आपले रक्ताचे नातेसंबंध नसते. म्हणून यांना नवऱ्याच्या घरातील सदस्य नको वाटतात. मग मित्रहो, या बाया काय करतात? आपल्या नवऱ्याला भावाबद्दल, बहिणीबद्दल, आई-वडिलांबद्दल व आजोबांबद्दल भलतेच काहीतरी लावून देतात किंवा त्यांचे कान भरतात. आणि आपल्या पतीच्या नातेवाईकांबद्दल त्याच्या मनात द्वेष व तिरस्कार निर्माण करतात. आपल्या पतीला एकाचे दोन लावून देतात. आणि आजकालची मुले पत्नीचे ऐकून आई-वडिलांना, भावांना व आजी-आजोबांना अंतर देऊन एकत्र कुटुंब पद्धतीला छेद देऊन विभक्त कुटुंब पद्धतीचा अवलंब करत आहेत. आपल्या बायको मुलांना घेऊन कुठेतरी लांब नोकरीच्या ठिकाणी म्हणा किंवा शहरी भागात स्थायिक होऊन मनसोक्त राहतात. आणि पत्नीच्या आदेशाप्रमाणे जीवन जगतात. ही वस्तुस्थिती सध्या आपण सर्वजण पाहत आहोत. कारण हल्ली माणसाचे मन कलुषित व गढूळ पाण्यासारखे झाले आहे. कारण आजकालच्या मुलांना शालेय शिक्षण म्हणावे तेवढे संस्कारक्षम व दर्जेदार मिळत नाही. शाळेत केवळ अभ्यासक्रम शिकवला जातो, अभ्यास क्रमाशिवाय इतर ज्ञानसंपदा किंवा संस्काराचे धडे आजकाल कोणत्याच शाळेत वा महाविद्यालयात दिले जात नाहीत. शिक्षक विद्यार्थ्यांना आई-वडिलांचे महत्त्व पटवून देत नाहीत. आई-वडिलांचे व आजी आजोबांचे महात्मे सांगणारे धडे आजकाल पुस्तकात समाविष्ट करणे काळाची गरज आहे. आई-वडिलांना अंतर देणे, त्यांना वृद्धाश्रमात पाठवणे, बहिण भावाचा शुल्लक कारणावरून अबोला धरणे आणि गुंठाभर जागेसाठी आपल्याच भावासोबत भांडण तंटा करणे हे सध्या सर्वत्र सर्रास सुरू आहे. याचे एकमेव कारण म्हणजे आजकालच्या पिढीला कुठेतरी संस्कार कमी पडलेत आणि त्यांना संस्कार देणे आणि त्यांना नात्याचे महत्त्व सांगणे ही सध्या काळाची गरज आहे. त्यासाठी शिक्षण विभागाने विद्यार्थ्यांना आई-वडिलांचे महात्मे सांगणारा आणि त्यांना संस्काराचे धडे देणारा अभ्यास पुस्तकात समाविष्ट करून विद्यार्थ्यांना अभ्यासाव्यतिरिक्त चांगला सुसंस्कारी नागरिक बनवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करावा. एकत्र कुटुंब पद्धतीचे महत्त्व पाठ्यपुस्तकात विद्यार्थ्यांसाठी समाविष्ट करून विद्यार्थ्यांना चांगला माणूस बनवून आई-वडिलांना, आजी आजोबांना, बहिण भावांना व समाज बांधवांना अडीअडचणीत, सुखदुःखात, कठीण काळात व संकटात मदत करणे हे आपले परम कर्तव्य आहे. आजी आजोबा संस्काराची खान असतात. आजी आजोबांना कधीच अंतर देऊ नका, त्यांच्या विचारांना व आचारांना आचरणात आणून माणसासारखे जीवन जगूया... त्यासाठी एकाच घरात, एकाच छताखाली आणि शेत वाटणी न करता सगळ्यांनी मिळून सर्व शेती एकत्र करावी...बुद्ध, फुले शाहू, आंबेडकरांचे विचार आचरणात आणून एकत्र कुटुंब पद्धतीला महत्त्व द्यावे, सुरुवात आपल्यापासून करूया म्हणजे आपोआप आपली प्रेरणा घेऊन प्रत्येक जण एकत्र कुटुंब पद्धतीला प्राधान्य देईल असे मला वाटते....

बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे
खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर
मो.७४९८७१५६६१

# त्रिपक्षीय करार राजकीय संवादासाठी आधार म्हणून राहिला पाहिजे

देशातील विरोधी पक्षांना एक खोड जडली आहे, ती म्हणजे कुठेही काहीही चांगले पाहायचे नाही. त्यानुसार देशभर बऱ्यापैकी शांतता असताना मणिपूरमध्ये अशांतता माजली होती आणि त्यावर विरोधी पक्ष विशेषकरून राहुल गांधी हे पंतप्रधान मोदी यांना सातत्याने टार्गेट करत होते. त्यांनी निवडणुकीच्या धामधुमीतही मणिपूरला भेट दिली नाही आणि त्यामुळे ईशान्येकडील राज्याचा मोदी यांनी अपमान केला आहे, असा विरोधी पक्षांचा सूर होता. पण मोदी यांनी आता १३ तारखेला मणिपूरला जाण्याचा निर्धार केला आहे आणि त्यांचा तसा कार्यक्रम ठरला आहे. त्यामुळे विरोधी पक्षांचा पोटशूळ बंद होईल अशी आशा आहे. हे खरे आहे, की मणिपूर हे ईशान्येकडील राज्य २०२३ पासून कुकी आणि मैतेई जातींच्या हिंसाचारात होरपळत आहे आणि तेथील सरकारला त्याच्या झळा पोहोचल्या आहेत. त्यामुळे मुख्यमंत्री एन. वीरेंद्र सिंग यांना राजीनामा द्यावा लागला होता. तेव्हापासून राज्यात केंद्रीय राजवट आहे. पण मैत्रेई आणि कुकी बंडखोर यांच्यातील संघर्ष कसा आटोक्यात आणावा हे कुणालाच समजत नव्हते. मणिपूर संघर्षाची कारणे बहुस्तरीय आहेत. ज्यात मणिपूर उच्च न्यायालयाने मैतेई समुदायाला एसटी दर्जा देण्याची जी शिफारस केली होती. त्यामुळे तुलनेत अल्पसंख्याक असलेल्या कुकी समाजात असुरक्षिततेची भावना निर्माण झाली. या संघर्षामुळे मैतेई आणि कुकी झो समुदायांत जमीन संसाधनांचा संघर्ष निर्माण झाला आणि याची परिणती अनर्थात झाली. परिणामी मणिपूर हे ईशानेकडील इतके दिवस शांत राहिलेले राज्य संसाधनांवरील ऐतिहासिक वाद, अंमली पदार्थाचा वाद आणि राजकारण यामुळे पराकोटीच्या संघर्षात सापडले. अजूनही ते अशांतच आहे. मैतेई समाजाला एसटी दर्जा देणे हे या संघर्षाचे मूळ आहे असे मानले जाते. या शिफारशीमुळे कुकी झो समाजाला जी अल्पसंख्य आहे तिला आपले अधिकार आणि लोकसंख्येतील स्थान गमावण्याची भीती वाटू लागली. तेथून या संघर्षाला सुरुवात झाली. जमिनीचे वाटप, संसाधनांवरील वाद आणि वाटपावरून संघर्ष यामुळे दोन जमातीत वाद पेटला आणि आता तो मागे हटण्याच्या स्थितीत नाही.

या संघर्षात खरे तर मोठे राजकारणी आणि कॉर्पोरेट यांचे हितसंबंध गुंतले आहेत हे जगजाहीर आहे. मणिपूरमधील वांशिक संघर्ष जुनाच आहे आणि त्याला विविध समुदायांमध्ये जमिनीच्या हक्कांवरून चढाओढ चालू होती त्याची पार्श्वभूमी आहे. आज त्या प्रदेशाला पंतप्रधान भेट देणार आहेत. ही निश्चितच अभिमानास्पद बाब आहे पण काँग्रेसने येथेही राजकारण करण्याचे सोडले नाही. पंतप्रधान मणिपूरला जात असतानाही काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी म्हटले, की पंतप्रधान केवळ तीन तासांकरिता या राज्याचा दौरा करणार आहेत. ही घाईघाईची भेट आहे आणि मणिपूरच्या लोकांनी या भेटीसाठी दीर्घ काळ वाट पाहिली आहे. पण रमेश यांची ही केवळ टीकेकरता टीका करायची म्हणून भूमिका झाली. मुळात असे आहे की पंतप्रधानांची भेट अशा वेळी होत आहे, की जेव्हा हा वांशिक प्रश्न सोडवण्याची वेळ आली आहे. मैत्रेई आणि कुकी झो या जमातीत जे वास्तविक पृथक्करण झाले होते, त्यामुळे दोन्ही जमातींच्या येण्या-जाण्यात अडथळा येत होता. तो आता दूर झाला नसला तरीही त्याला होणारा विरोध मात्र काहीसा शमला आहे. त्रिपक्षीय करार जो झाला होता तो बंडखोरांचा गट आणि लष्कर यांच्या कारवायांत अगोदर संपूर्ण अडथळा आणणे किंवा तो संपूर्ण थांबवणे हे अत्यावश्यक होते. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी विनाअडथळा कुणालाही कुठेही जाऊ देण्याचे आवाहन केले होते. पण तो पुढाकार पहिल्याच दिवशी कोसळला. त्यानंतर मुख्यमंत्री एन. वीरेंद्र सिंग यांनी पुन्हा त्या करारातून माघार घेतली आणि हा संघर्ष उफाळला. सरकारने हा संघर्ष सुरू झाल्यावर भारत आणि म्यानमार सीमेवर कुंपण घालण्याचा निर्णय जाहीर केला आणि त्यामुळे नागा कौन्सिलने त्याविरोधात ट्रेड एम्बार्गो जाहीर केला. हा त्रिपक्षीय करार राजकीय संवादासाठी आधार म्हणून राहिला पाहिजे आणि मणिपूरला मिलिशिया चालीत राजरकारणापासून मुक्त केले पाहिजे. आणि सेनापती जिल्ह्यात नागा जमातींचे प्राबल्य असलेल्या राष्ट्रीय महामार्ग एनएच ०२ हा पुन्हा सुरू झाला पाहिजे. भारतात अन्य राज्ये आहेत आणि मणिपूर हेही भारतात आहे. त्यामुळे या राज्यापासून आपण दूर होता कामा नये. काँग्रेस काहीही म्हणो, पण मोदी यांची मणिपूर भेट अशा वेळी होत आहे, की ज्यावेळी हा दीर्घकाळापासून प्रलंबित असलेला प्रश्न सुटण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

कुकींनी राष्ट्रीय महामार्ग पुन्हा सुरू करण्याचा घेतलेला निर्णय आणि त्याबरोबरच दोन्ही जमातीत पुन्हा शांतता बोलणी सुरू होण्याची शक्यता यामुळे हा प्रदीर्घ काळापासून प्रलंबित असलेला वांशिक संघर्षाचा प्रश्न सुटण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मोदी यांच्या मणिपूर भेटीचा हा अन्ययार्थ आहे. मोदी यांच्या या भेटीच्या निमित्ताने एसओओ आणि केंद्र सरकार आणि कुकी नॅशनल संघटना आणि युनायटेड पीपल्स फ्रंट यांच्यात समझोता होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मोदी यांचा हा दौरा राज्यात अनेक महिन्यांपासून सुरू असलेल्या हिंसाचारापासून राज्याची सुटका करेल असे वाटत आहे आणि राज्यात पुन्हा शांतता प्रस्थापित होईल. मणिपूरमध्ये गेल्या दोन वर्षांपासून जी अशांतता आणि हिंसाचार उफाळला होता त्याला आता विश्रांती मिळेल. त्यादृष्टीने मोदी यांचा हा दौरा फलद्रुप ठरेल अशी आशा आहे. राज्य आणि केंद्राने मध्यंतरीच्या काळात अनेक प्रयत्न केले पण हिसांचाराचा जो सिलसिला सुरू झाला तो कुणालाच थांबवता आला नव्हता. सरकारने विविध समाजिक संघटनांशी चर्चा केली पण त्यातून काहीही परिणाम बाहेर आला नाही. आता तसे होईल असे वाटत आहे.

# ढोकसाळ ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी शोभाबाई गव्हाणे यांची बिनविरोध निवड



(नवनाथ गव्हाणे/ दै.धर्मयोध्दा)

**बदनापुर** - तालुक्यातील ढोकसाळ ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी सौ. शोभाबाई गव्हाणे यांची बिनविरोध निवड झाली. पूर्वनिर्वाचित उपसरपंच हनिफाबी हुसेनखाँ पठाण यांनी राजीनामा दिला होता. तर उपसरपंच पदाची जागा रिक्त झाली होती. त्यामुळे निवड प्रक्रियेत इतर कोणत्याही उमेदवाराने अर्ज दाखल न केल्यामुळे शोभाबाई राम किसन गव्हाणे यांच्या नावावर एकमुखी शिक्कामोर्तब झाले.

ग्रामपंचायतीच्या सभागृहात झालेल्या या बैठकीस सरपंच सौ. अश्विनीताई पवार अध्यक्षस्थानी होत्या. ग्रामसेवक विलास गायकवाड यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या प्रक्रियेत सर्व सदस्यांनी शोभाबाई रामकिसन गव्हाणे यांना पाठिंबा दर्शविला. पोलीस कर्मचारी श्री जैस्वाल साहेब श्री दासर साहेब उपस्थित होते तर ग्रामपंचायत सदस्य चंद्रकला गजानन गव्हाणे, कावेरी विठ्ठल लोखंडे ,आशाबाई शिवाजी वाघ, ललीताबाई जगन्नाथ पवार, उपस्थित ग्रामस्थ ज्ञानेश्वर गव्हाणे (माऊली),भाऊसाहेब गव्हाणे, रामकिसन गव्हाणे,जगन्नाथ पवार, बाबुलाल पठाण,शरद पवार, ऊद्धव गव्हाणे, कृष्णा दहातोंडे, बद्री पवार, अरविंद डमरे हे उपस्थित होते.

निवड झाल्यानंतर गावातील कार्यकर्ते व ग्रामस्थांनी शोभाबाई गव्हाणे यांचे हार्दिक स्वागत करून अभिनंदन केले. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी जबाबदारी पार पाडणार असल्याचा निर्धार नवनिर्वाचित उपसरपंच शोभाबाई गव्हाणे यांनी यावेळी व्यक्त केला.

# मेघा इंजिनिअरिंग प्रकरण: १४ कोटी दंड वसुलीवरून राजकीय वाद ; आमदार बबनराव लोणीकर यांचे रोहीत पवारांना सडेतोड प्रत्युत्तर

(प्रविण जगताप/दै.धर्मयोध्दा)

**जालना** – परतूर तालुक्यातील अवैध वाळू-मुरम उत्खनन प्रकरणी मेघा इंजिनिअरिंग अँड इन्फ्रास्ट्रक्चर्स लि. (चएखड) वर ठोठावण्यात आलेल्या तब्बल ९४.६८ कोटी दंडाच्या वादावरून राज्यात राजकीय खळबळ माजली आहे. या प्रकरणी राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर दंड माफ केल्याचा आरोप केला होता.

मात्र, परतूरचे आमदार बबनराव लोणीकर यांनी आज पत्रकार परिषदेत या आरोपांना सडेतोड प्रत्युत्तर दिले. लोणीकर म्हणाले, दंड माफ झालेला नाही, फक्त अपील प्रक्रियेमुळे तात्पुरती स्थगिती मिळाली आहे. संपूर्ण ९४.६८ कोटी रुपये लवकरच वसूल होतील, याची मी हमी देतो.

२०१८-१९ मध्ये चएखड ने २६ हजार ब्रास वाळू व ५२ हजार ब्रास मुरम परवानगीशिवाय उपसा केल्याचा आरोप आहे. महसूल विभागाने ३८.७० कोटी (जालना) व ५५.९८ कोटी (परतूर) असा दंड ठोठावला. कंपनीने अपील दाखल करत १% रक्कम (१७.२८ लाख) जमा केली, परंतु संपूर्ण दंडाची वसुली प्रलंबित आहे.

लोणीकर यांनी स्पष्ट केले की हे प्रकरण तत्कालीन महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या काळातील आहे. बावनकुळे यांच्यावर रोहित पवारांनी केलेले आरोप खोटे असल्याचे सांगत लोणीकरांनी पवारांना राजकीय संन्यास घेण्याचा सल्ला दिला.

पर्यावरणीय नुकसानीवरही त्यांनी भर दिला. अनधिकृत उत्खननामुळे नदीपात्र व शेतजमिनींचे मोठे नुकसान झाले. शेतकऱ्यांच्या हक्काचे पाणी कमी झाले. शासनाने अशा प्रकरणांत कठोर कारवाई केलीच पाहिजे, असे लोणीकर म्हणाले.

महसूल विभागाने नुकत्याच दिलेल्या पत्रांत संपूर्ण दंड वसूल करण्याचे निर्देश आहेत. कंपनीकडून दंड न भरल्यास जप्त यंत्रसामग्रीचा लिलाव करण्याची तयारी प्रशासनाने दर्शवली आहे.

# पूर्णा रेल्वे स्थानक परिसरात अतिक्रमण आणि गुन्हेगारीचा विळखा; नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना

(असद शेख/ दै.धर्मयोध्दा)



**पुर्णा** - रेल्वे स्थानक परिसर सध्या अतिक्रमण, अनधिकृत व्यवसाय, दारू यामुळे नागरिकांसाठी त्रासदायक ठरत आहे. या परिसरातील परिस्थिती गंभीर बनली असून, स्टेशनच्या मुख्य गेटपासून अष्टभुजा देवीकडे शास्त्रीनगर कडे जाणारा मुख्य रस्ता अतिक्रमणामुळे जवळपास बंद झाला आहे. दोन पदरी रस्ता आता केवळ पायी चालण्याइतकाच उरला आहे. रस्त्यावर उघड्यावर दारू पिणारे व मास विक्री होत असून, दिवस-रात्र मद्यपींचा मुक्त संचार सुरू आहे. यामुळे या भागातून जाणाऱ्या महिला आणि विद्यार्थिनींना दिवसाढवळ्याही असुरक्षित वाटत आहे. अनेकांना लांबचा पर्यायी मार्ग वापरण्यास भाग पडत आहे. कुटुंबासह या मार्गावरून जाणे धोकादायक बनले असून, शालेय मुली आणि महिलांवरील छेडछाडीच्या घटनांमुळे परिसरात भितीचे वातावरण आहे.

नियमबाह्य परवानग्यांचा प्रश्न परिसरातील अनेक हॉटेल्स, बार, वाईन शॉप्स आणि देशी दारूचे अड्डे वेळेपूर्वी उघडत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. या दुकानांना पार्किंगची सुविधा नसतानाही नगरपालिकेने नियमबाह्य पद्धतीने परवानग्या दिल्याचा दावा होत आहे. या परवानग्या रद्द करण्याची मागणी जोर धरत आहे. नशेत रस्त्यावर उभे राहून लघुशंका करणारे व रस्त्यावर उभे राहून दारू पिणारे यामुळे सकाळ-संध्याकाळ परिसरात घाणीचा वास येत असल्याने नागरिकांचे जेवणही विस्कटत आहे. तसेच, बंदी असलेल्या प्लास्टिकचा ढीगही या भागात दिसून येतो.

दारूच्या दुकानांमुळे रेल्वे स्थानक परिसर हळूहळू गुन्हेगारांचा अड्डा बनत चालला आहे. वाहनचालक रस्त्यावर वाहने उभी करून प्रवाशांना अडवून व्यवसाय सुरू ठेवला आहे. स्थानिकांनी पोलिस ठाणे आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे अनेकदा तक्रारी केल्या, परंतु ठोस कारवाईचा अभाव आहे. यामुळे पोलिस प्रशासनाविषयी नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

नागरिकांनी शासन आणि प्रशासनाकडे तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. अतिक्रमण आणि अनधिकृत व्यवसायांवर नियंत्रण आणून रस्ता मोकळा करावा, नियमबाह्य परवानग्यांद्वारे सुरू असलेली वाईन शॉप्स आणि दारू दुकानांच्या परवानग्या रद्द कराव्यात, तसेच परिसर सुरक्षित करण्यासाठी पोलिस गस्त वाढवावी, अशी मागणी नागरिकांनी लावून धरली आहे. प्रशासन आणि पोलिस यंत्रणा यावर त्वरित कारवाई करणार का ? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# सर्पदंशामुळे गाईचा मृत्यू : सामाजिक कार्यकर्त्यांकडून विधिवत अंत्यसंस्कार – नगरपंचायतीने दखल घ्यावी अशी नागरिकांची मागणी



(प्रदिप सावले /दै.धर्मयोध्दा)

**मालेगाव** – प्रभाग क्र.२ येथील पाण्याच्या टाकी समोर एका मूक जनावराचा (गाय) सर्पदंशामुळे मृत्यू झाला परिसरातील झुडपे,गवत व अस्वच्छतेमुळे अशी दुर्घटना घडल्याचे समोर आले आहे या घटनेनंतर नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून,रात्रीच्या वेळी मनुष्याच्या जीवाला देखील धोका संभवतो,अशी गंभीर शक्यता व्यक्त केली जात आहे गाईच्या मृत्यूनंतर सामाजिक कार्यकर्त्यांनी पुढाकार घेत सौ.रज्जू गजानन काळे या महिलोनी विधिवत साडीचोळी व ओटी भरून तिचे अंत्यसंस्कार केले या वेळी कार्यकर्ते गजानन काळे,सतीश राठोड,संदीप कपूरवार,ओम खुरसडे,धीरज लव्हाळे,योगेश काळे उपस्थित होते. तसेच गड्डा खोदण्यासाठी सामाजिक जाणिवेतून ज्ञानेश्वर काटेकर व राम काटेकर यांनी त्वरित मोफत जेसीबी उपलब्ध करून दिले त्यांच्या या कार्याचे उपस्थितांनी मनापासून कौतुक केले दरम्यान,या घटनेने नगरपंचायतीच्या निष्क्रियतेकडे लक्ष वेधले आहे प्रत्येक वार्डामध्ये नाल्यांच्या काठावर व रस्त्यालगत झुडपे व गवत वाढले असून पावसाळ्यामुळे सर्पदंशाच्या घटना घडण्याची शक्यता अधिक आहे या भागांमध्ये लहान मुले खेळत असतात,त्यामुळे धोका आणखी गंभीर ठरतो नागरिकांची ठाम मागणी आहे की नगरपंचायतीने तात्काळ झुडपे व गवत काढून परिसर स्वच्छ करावा,तसेच तणनाशक फवारणी करून स्वच्छता मोहीम हाती घ्यावी अन्यथा एखादा मोठा अपघात घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# कर्तव्यदक्ष सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक मस्के व दामिनी पथकच्या साळवे मॅडम यांनी साधला विद्यार्थ्यांशी संवाद



(शिवा पाटील/ दै.धर्मयोध्दा)

**सेनगाव-** पोलीस स्टेशन कर्तव्यदक्ष सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक मस्के व सोबत दामिनी पथक डलि साळवे मॅडम हिंगोली यांनी सेनगाव पोलीस स्टेशन येथे प्राथमिक जिल्हा परिषद शाळा सेनगाव येथे विद्यार्थिनींना संरक्षण विषयावर मार्गदर्शन करून संवाद साधला व तसेच शास्त्र बाबत हल बांगर यांनी माहिती देऊन विद्यार्थ्यांना पॉक्सो क्ट बालविवाह करणे कायद्याने गुन्हा आहे गग ऍक्ट गुड टच बॅड टच वाहतूक नियम सुरक्षा सायबर शाळेतील परिसरातील गुन्हेगारी व गैरवर्तन रोखणे पोलिसांविषयी भीती कमी करून विश्वासाचे नाते तयार करणे मादक पदार्थांचे तोटे व मादक पदार्थ जवळ बाळगणे याबाबत शिक्षा व मार्गदर्शन करण्यात आले संरक्षण मुलींसाठी सेल्फ डिफेन्स, साठी १०९८/ ११२ या नंबर वर कॉल करावा याचबरोबर शाळेतील तक्रारपेटी बद्दल विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली कोणत्याही विद्यार्थ्यांना कोणी शाळेत जातानी येतानी त्रास देत असल्यास ११२ नंबरला कॉल करावा शाळेमध्ये जाताना कोणी मोटरसायकल वरील व्यक्ती त्रास देत असल्यास तर त्या गाडीचा नंबर नोट करून घ्यायचा आणि ११२ ला कॉल करायचा श्रलि साळवे मॅडम हिंगोली यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व सेनगाव पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक मस्के यांनी विद्यार्थ्यांना कायदे विषयी माहिती दिली सहायक पोलीस निरीक्षक दीपक मस्के शाळेतील विद्यार्थ्यांना काही प्रश्न मंजुषा घेऊन विद्यार्थ्यांना गिफ्ट सुद्धा देण्यात आले यावेळी विद्यार्थी खूप मोठ्या संख्येने उपस्थित होते यासाठी शाळेचे शिक्षक, होमगार्ड व इतर सर्वांनी उपस्थित होते.

# बंजारा समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गामध्ये आरक्षण द्यावे -विनोद आडे यांच्या आमरण उपोषणाला राष्ट्रीय बंजारा सेनेचा जाहीर पाठिंबा

(सिध्देश्वर गिरी/ दै.धर्मयोध्दा)



**सोनपेठ-** बंजारा समाजाला अनुसचित जमातीत समावेश करून आरक्षण देण्याची मागणी करत विनोद आडे हे उपोषण करत आहेत.बंजारा समाजाला हैदराबाद स्टेट गॅझेटिअर १९२० नुसार अनुसूचित जमाती प्रवर्ग देण्यात येण्यासाठी विनोद आडे यांनी सलग चार दिवसापासून आमरण उपोषण चालू ठेवले आहे या उपोषणाला राष्ट्रीय बंजारा सेना राष्ट्रीय अध्यक्ष जयकुमार राठोड,राष्ट्रीय बंजारा सेना महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षा चंचल पवार,उपाध्यक्ष राजेश नायक मराठवाडा अध्यक्ष ऋषिकेश राठोड.मराठवाडा उपाध्यक्ष अमोल राठोड,सुभाष पवार यांनी या उपोषनास भेट देऊन विनोद आडे यांच्या प्रकृतीची विचारपूस करून उपोषणाला जाहीर पाठिंबा दिला. अनेक पुराव्यानुसार बंजारा समाज हा ऐतिहासिक दृष्ट्या व प्रशासकीय नोंदीनुसार आदिवासी समाजामध्ये आहे परंतु सध्या स्थितीमध्ये महाराष्ट्र त्यांना विमुक्त जाती भटक्या जमाती मध्ये स्थान आहे. त्यामुळे समाजाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असुन.हैदराबाद गॅझेटिअरचा आधार घेऊन तेलंगणा व आंध्र प्रदेश या राज्यामध्ये बंजारा समाजाला अनुसूचित जमातीचा दर्जा देण्यात आला आहे तरी आपण हैदराबाद गॅजेटियरचा आधार घेऊन तेलंगणा व आंध्र प्रदेश या राज्याचा आधार घेऊन बंजारा समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गामध्ये समावेश करून आरक्षणाचा लाभ देण्यात यावा असे राष्ट्रीय बंजारा सेना संघटना यांनी जाहीर पाठिंबा पत्रातून नमूद केले आहे.

# मालेगावात पर्युषण पर्वाची सांगता भक्तिभावात ! – उपासकांचा गौरव,पंडितजींचा सन्मान आणि क्षमायाचनाने समारोप

(प्रदिप सावले/दै.धर्मयोध्दा)



**मालेगाव** – येथे श्री दिगंबर जैन समाजाचा सर्वात मोठा धार्मिक पर्व मानला जाणारा पर्युषण पर्व यावर्षी मालेगावात दहा दिवस अत्यंत उत्साहात,भक्तिभावात आणि साधनेच्या वातावरणात पार पडला समाजबांधवांच्या मोठ्या सहभागामुळे मंदिर परिसर अध्यात्मिकतेने उजळून निघाला दिनांक ३ सप्टेंबर रोजी पर्वाच्या पाचव्या दिवशी चंद्रकांता ताई विनोदजी फलेजिया यांनी निर्जल उपास करून अध्यात्मिक साधनेचा आदर्श घालून दिला त्यांच्या या तपस्येबद्दल शाल-श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला तसेच आरती राजू टिकाईत यांनीही सलग पाच दिवस उपास केले असून त्यांच्या साधनेबद्दलही मंदिर समितीच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला उपास समाप्तीनंतर चंद्रकांता ताई फलेजिया यांनी भाविकांना केळाचे प्रसादाचे वाटप करून धर्मपरंपरेला बळ दिले दरम्यान,परमपूज्य गणिनी प्रमुख आर्यिका १०५ श्री ज्ञानमती माताजी यांच्या आरोग्य सुधारण्यासाठी श्री १००८ आदिनाथ दिगंबर जैन मंदिरात समस्त जैन बांधवांनी एकत्र येऊन नमोकार मंत्रांचा जप केला. माताजींच्या उत्तम स्वास्थ्यासाठी सर्वांनी सामूहिक प्रार्थना केली दहा दिवसांचा हा पर्व अनंत चतुर्दशीच्या दिवशी मोठ्या उत्साहात संपन्न झाला यावेळी कोल्हापूरहून पधारलेले पंडितजींचा शाल-श्रीफळाने सन्मान करून समाजबांधवांनी त्यांना निरोप दिला अखेरच्या दिवशी क्षमायाचना करण्यात आली जैन परंपरेनुसार प्रत्येक समाजबांधवाने एकमेकांची क्षमा मागून मिच्छामी दुक्कडम् म्हणत पर्वाचा समारोप केला समाजातील बंधुभाव,साधना आणि क्षमायाचना यामुळे यंदाचे पर्युषण पर्व मालेगावात अधिकच संस्मरणीय ठरले आहे.

# पाल्याच्या जडणघडणीमध्ये शाळेसोबत पालकांचीही भूमिका महत्त्वाची.-सौ.भावनाताई नखाते

(मुरलीधर गोंगे/ दै.धर्मयोध्दा)



**पाथरी–** विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती साधण्यासाठी शाळेतील भौतिक सुविधा,शैक्षणिक उपक्रम,तज्ञ शिक्षक या सोबतच पालकांनी आपल्या पाल्याच्या शैक्षणिक प्रगतीकडे लक्ष दिले पाहिजे असे भावनाताई नखाते यांनी प्रतिपादन केले.

मंगळवार दि ०९ सप्टेंबर २०२५ रोजी वाल्मिकी शिक्षण प्रसारक मंडळ परभणी संचलित शांताबाई नखाते प्राथमिक,माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पाथरी ता. पाथरी येथे शिक्षक पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी त्या अध्यक्षीय स्थानावरून बोलत होत्या. शाळा,विद्यार्थी व पालक हा शैक्षणिक त्रिकोण आहे. शाळा विकासासाठी पालकांच्या सूचना ह्या अत्यंत महत्त्वाच्या असतात या हेतूने प्रस्तुत शाळेत शिक्षक पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमास संस्थेचे संचालक तथा वाल्मिकेश्वर ऍग्रो प्रोड्यूसर कंपनी देवनांद्राचे कार्यकारी अधिकारी आदित्य नखाते,संस्थेचे प्रशासकीय अधिकारी रोहिदास टेंगसे , मुख्याध्यापक नवनाथ यादव,प्राचार्य किशन डहाळे, पालक प्रतिनिधी सुरेशराव जाधव,मंगलताई भाले-राव, सय्यद रफिक, राधाताई दाढेल,सुरेश ढवळे, तुकाराम वाघ,अब्दुल खालेद बामुसा, अमोल तुपकर,शारदाताई पवार आदी उपस्थित होते.

संस्थेचे संचालक आदित्य नखाते यांनी पालकांशी प्रत्यक्ष चर्चा केली. उपस्थित पालकांपैकी अनेक जणांनी या चर्चेमध्ये सहभाग नोंदवला.सांगोपांग चर्चा झाल्यानंतर त्यावर लवकरच उपाययोजनाही करण्यात येतील असे आदित्य नखाते यांनी उपस्थितांना आश्वासन दिले.

येथे आम्ही घडलो या उपक्रमांतर्गत शाळेची माजी विद्यार्थिनी कु. गायत्री सचिन कागबट्टे हिची पुणे येथे अभियांत्रिकी अभ्यासक्रमसाठी निवड झाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते पालकांसह तिचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक नवनाथ यादव यांनी केले. पालकांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्यांच्या अनुषंगाने काही सूचना मांडल्या. विचारांची आदान प्रदानता करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती विषयी पालकांनी समाधान व्यक्त केले.भविष्यात विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व घडविण्याच्या दृष्टीने शाळेच्या उपक्रमामध्ये सहभागी होण्याची पालकांनी मनीषा व्यक्त केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बळीराम चव्हाण व आसाराम सोनवणे यांनी केले तर आभार प्रदर्शन अरविंद गजमल व परमेश्वर खरात यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमास पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पालम येथे मान्यवरांच्या उपस्थितीत साजरा होणार श्री गोविंदप्रभु व चक्रधरस्वामी अवतार दिन महोत्सव

**पालम–** परभणी जिल्ह्यातील वेगवेगळ्या ठिकाणी साजरा होणारा महानुभाव संप्रदायाचे परब्रह्म परमेश्वर अवतार श्री गोविंदप्रभु महाराज व सर्वज्ञ श्री चक्रधरस्वामी महाराज यांचा अवतार दिन महोत्सव यावर्षी पालम येथे येत्या शुक्रवार (ता.१२) आणि शनिवार (ता.१३) रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे.

शुक्रवारी या महोत्सवाचे उदघाटन होणार आहे. याप्रसंगी उपाध्य अन्माय आचार्य प.पु. रुद्धपुरकरबाबा शास्त्री अजिंठा, माहूर पिठाधीश कवीश्वराचार्य प.पु.म. माहूरकरबाबा शास्त्री, प.पु.म. आचार्य वाकिरकरबाबा जामोदेकर नागपूर, प.पु.म. आचार्य गुंजटकरबाबा कोठी पेठ पिंपळगाव यांची उपस्थिती राहणार आहे. यावेळी राज्यमंत्री तथा पालकमंत्री मेघनादिदी साकोरे-बोर्डीकर यांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. यावेळी भागवताचार्य प.पु.म. आचार्य चिरडेबाबा, स्वागताध्यक्ष ड. विजयकुमार शिंदे तसेच भास्करराव सिरसकर यांचीही उपस्थिती राहणार आहे. पहिल्या दिवशी पालखी, शोभायात्रा आणि मूर्तीपुजन मान्यवरांच्या हस्ते होणार आहे.

शनिवारी होणाऱ्या समारोपीय कार्यक्रमासाठी साहेबराव सिरसकर, श्री गणेशदादा रोकडे, इमदाद खाँ पठाण,भाऊसाहेब भोसले, प्रभाकरराव सिरसकर, वसंतराव सिरसकर, गजानन सिरसकर, रत्नाकर शिंदे, तुषार गोळेगावकर, कैलासराव रूद्रवार, गिरीश सोळंके, ज्ञानराज घोरपडे आदि मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. यावेळी विशेष उपस्थितीत मार्गदर्शक आचार्य भोजनेबाबा, आचार्य तेल्हारकरबाबा, आवेराजबाबा तेल्हारकर,परिषदेचे अध्यक्ष विश्वनाथबाबा कोठी, कार्याध्यक्ष परसराजबाबा अंकुळनेरकर, उपाध्यक्ष आंबेकरबाबा कोठी, करंजीकरबाबा शेवलीकर, सचिव देमेराजबाबा कपाटे, सहसचिव केजकरबाबा कोठी इत्यादी महानुभावांची उपस्थिती राहणार आहे.

या कार्यक्रमास येऊन संत दर्शनासह ज्ञानश्रवणाचा लाभ अनुयायांनी घ्यावा असे आवाहन उत्सव प्रमुख मधेराजबाबा वायंदेशकर, उत्सव समितीचे बाळकृष्णदादा भोजने, कृष्णराजबाबा शेवलीकर, बिटरगावकरबाबा आमृते, राम चंद्रबाबा तेल्हारकर, गोमेराजबाबा जामोदेकर, महेंद्रमुनी कपाटे, प्रदीपराज तेल्हारकर आदी महानुभावांसह पालम तालुक्यातील महानूभाव अनुयायांनी केले आहे.

## थोडक्यात...

### न्यू ईरा इंग्लिश स्कूलची कबड्डी स्पर्धेत भरारी



(संतोष तायडे/दै.धर्मयोध्दा)

**बोरी-** सध्या परभणी जिल्ह्यामध्ये प्रत्येक तालुक्यात तालुकास्तर पावसाळी क्रीडा स्पर्धा सुरू असून आतापर्यंत अनेक क्रीडा स्पर्धा तालुका क्रीडा संकुल जिंतूर जवळील अकोली येथील क्रीडा संकुलात पार पडल्या .त्यात तालुक्यातील अनेक शाळांनी सहभाग घेतला आणि प्रत्येक क्रीडा स्पर्धेत नैपुण्य दाखवले . त्याप्रमाणे आज तालुका क्रीडा संकुल जिंतूर येथे १४ वर्ष वयोगटातील कबड्डी स्पर्धेत जिंतूर तालुक्यातून सोळा संघांनी भाग घेतला होता .सदरील क्रीडा स्पर्धा साखळी पद्धतीने पार पडल्या आणि या कबड्डी स्पर्धेत न्यू इरा इंग्लिश स्कूल जिंतूरच्या संघाने महत्त्वपूर्ण बाजी मारून तालुकास्तर क्रीडा स्पर्धेत अव्वल राहिले आणि ते जिल्हास्तर कबड्डी स्पर्धेसाठी पात्र ठरले . त्याबद्दल सर्व कबड्डीपटूंचे व मार्गदर्शक शिक्षक श्री . राहुल आंबेकर यांचे शाळेच्या अध्यक्षा सौ .कृपा दिनकर चौधरी व सचिव डी.जी . चौधरी यांनी अभिनंदन केले व शाळेचे प्राचार्य श्री संजय कांबळे सर उपप्राचार्य सूर्यवंशी सर तसेच वानखडे सर यांनी सदरील कबड्डीपटूंचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला व जिल्हास्तर स्पर्धेसाठी हार्दिक शुभेच्छा व्यक्त केल्या .

### केंद्रीय कन्या शाळा बोरी येथे स्वागत व निरोप समारंभ पार



(संतोष तायडे/दै.धर्मयोध्दा)

**बोरी-** जिंतूर तालुक्यातील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक कन्या शाळा बोरी येथे दिनांक ०९/०९/२०२५ रोजी बदली झालेल्या शिक्षकांची व नवीन आलेल्या शिक्षकांना स्वागत व निरोप समारंभ घेण्यात आला या कार्यक्रमाचे अध्यक्ष जिल्हा परिषद प्रशाला बोरीचे मुख्याध्यापक श्री प्रवीण रांजवन सर प्रमुख पाहुणे म्हणून ज्योती उलेमाले मॅडम श्री. पंडित दाभाडे सर हे होते बदली झालेल्या शिक्षक मिलिंद माटे सर श्रीकांत दायमा सर राजू लांडगे सर विश्वनाथ बनसोडे सर. पुनम पारसेवार मॅडम. विजय माला विजय माला झोडपे मॅडम. मीरा आव्हाड .शिंपले. मनीषा जाधव मॅडम. यांची बदली झाल्यामुळे निरोप देण्यात आला तर शिरीष बोरोले शंकरराव खिस्ते सर. संगीता कदम. उमेश बेंबळगे सर. स्वाती भंगिरे. स्वप्न वैद्य. प्रज्ञा खिल्लारे. रोडे सविता. यांचे स्वागत करण्यात आले या कार्यक्रमासाठी श्री अभिमन्यू राठोड. दत्तराव शिंपले. भिमाजी सौने. सीरीन सिद्दिकी. स्वामी गीतांजली मॅडम . सिंधू फड नीता. आव्हाड मुक्ता गभने. ज्योती स्वामी. यांनी परिश्रम घेतले यावेळेस विद्यार्थी व गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

# हैदराबाद गॅझेट लागू करुन बंजारा समाजाला एस.टी.सवलतीचे आरक्षण द्या

## प्रा.संतोष राठोड यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधीकारी मार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन



(महेंद्र पुरी/दै.धर्मयोध्दा)

**हिंगोली –** जिल्ह्यातील सर्व गोर बंजारा समाजाच्या वतीने बंजारा समाजाला एसटी आरक्षण देण्यासाठी बंजारा समाजाचे नेते प्रा.संतोष राठोड यांच्या नेतृत्वाखाली गोरसेना बांधवांच्या वतीने दि. १० सप्टेंबर रोजी हिंगोली जिल्हाधीकारी यांच्या मार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले. यावेळी दिलेल्या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, निजाम प्रांतातील १९०१ ते १९४८ पर्यंत हैदराबाद गॅझेटमध्ये गोरबंजारा, लंबाडा,लमाण जातीची नोंद जमात अशी असून त्यानुसार तेलंगणा आंध्रप्रदेशातील बंजारा,लंबाडा जातीना अनुसुचित जमातीचे आरक्षण मिळालेले आहे मात्र १९४८ नंतर राज्य पुनर्रचनेदरम्यान मराठवाडा सह विदर्भ खानदेशचा भाग

महाराष्ट्राला जोडल्यामुळे मुळचे असलेले अनुसुचित जमातीचे आरक्षण

संपुष्टात येवून विमुक्त जातीच्या संवर्गात रुपांतरित करण्यात आले.त्यामुळे महाराष्ट्रातील गोरबंजारा समाजावर एस टी आरक्षणाबाबत घोर अन्याय झाला आहे मात्र गेल्या काही दिवसात मराठा कुणबी एकच असल्याचे समजून हैदराबाद गॅझेटनुसार आरक्षण देणार असल्याचे फडणवीस सरकारने जि आर काढून जाहीर केले आहे. त्याला अनुसरुनच महाराष्ट्रातील गोरबंजारा समाजाला हैदराबाद गॅझेट लागू करून अनुसूचीत जमातीचे एस टी चे आरक्षण देण्याची मागणी गोरसेनेने निवेदनाद्वारे केली आहे जिल्हाधिकारी यांना गोरसेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा संदेश चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण महाराष्ट्रात आज १० सप्टेंबर रोजी निवेदन देण्यात आले.हिंगोली जिल्ह्यात प्रा. संतोष राठोड यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आलेल्या निवेदना मध्ये असे नमूद केले आहे की,महाराष्ट्रातील गोरबंजारा समाजाजवळ १९५० अगोदर अनुसुचित जमातीचे दुर्मिळ पुरावे असून क्रिमीनल ट्राईब कायद्याने बाधीत असूनही सेंट्रल प्रोवीन्स व बेरार प्रांतामध्ये तसेच हैदराबाद गॅझेट मध्ये त्यांना अनुसुचित जमातीच्या यादीत स्थान दिलेले होते.मात्र भाषावार प्रांतरचना, राज्य पुनर्चना कायद्याचा फटका महाराष्ट्रातील गोरबंजारा लमाण लंबाडी यांना बसला असून मुळ आरक्षणाला मुकावे लागले आहे .यासाठी गोरबंजारा समाजाने सातत्याने संघर्ष पुकारला असून त्यांना न्याय देण्यासाठी बापट आयोग,इधाते आयोग,भाटीया आयोग डिएनटी एस टी आयोगाने महाराष्ट्रातील गोरबंजारा हा अनुसुचित जमातीचे आरक्षणाबाबत सकारात्मक शिफारशी करुनही त्यांना ते आरक्षण देण्यात आलेले नाही. .डोंगर दर्यात राहणारा समाज आजही आदीम समुदायाची सर्व पात्रता पूर्ण करतो कारण स्वतंत्र बोली, भाषा, पेहराव, धाटीपरपंरा, स्वतंत्र तांडावस्ती, खानपान, स्वतंत्र असूनही त्यांना एस टी आरक्षणा पासून जाणीवपूर्वक टाळले जात आहे. अनुसूचित जमातीचे आरक्षणाबाबत माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक, राष्ट्रसंत रामराव महाराज सह अन्य समाजसुधारकांनी सातत्याने प्रयत्न केले असून –गोरसेना या बंजारा समाजातील अग्रगण्य संचटनेने गेल्या विस वर्षापासून मोर्चा आंदोलने केलेली आहेत. मराठा कुणबी समाजासाठी हैदराबाद गॅझेटनुसार आरक्षण लागू होते त्या धर्तीवर गोरबंजारा समाजासाठी सुद्धा तेच गॅझेट लागू करुन एस टी प्रवर्गाचे आरक्षण मिळावे अशी मागणी गोरसेनेने निवेदनाद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जिल्हाधिकारी मार्फत केलेली आहे.

# पुर्णा–नांदेड रस्त्यावरील भीषण अपघातात तरुणाचा मृत्यू, कुटुंबावर दु:खाचा डोंगर



(असद शेख/दै.धर्मयोध्दा)

**पुर्णा -** नांदेड रस्त्यावर न–हापुर शिवारात बुधवारी, सायंकाळी ६ ते ७ च्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात ३० वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू झाला. नांदेडकडे जाणाऱ्या छोटा हत्ती (टाटा एस गोल्ड) वाहनाने दुचाकीला दिलेल्या जोरदार धडकेत ही दुर्दैवी घटना घडली. मृत तरुणाचे नाव मुंजाजी सुदामराव क–हाळे (वय ३०, रा. भाटेगाव, ता. पुर्णा, जि. परभणी) असे आहे. ते पुर्णा सहकारी साखर कारखान्यात कर्मचारी होते. या घटनेमुळे भाटेगावसह संपूर्ण पुर्णा परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मुंजाजी क–हाळे हे आपल्या दुचाकीवरून (क्र. एम.एच.२२/बीबी/१९१५) पुरनेहून भाटेगावकडे जात होते. त्याचवेळी नांदेडकडे भरधाव वेगाने जाणाऱ्या छोटा हत्ती वाहनाने (क्र. एम.एच.२६/बीई/५७३८) त्यांच्या दुचाकीला समोरून जोरदार धडक दिली. या धडकेत मुंजाजी यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला. अपघात इतका भयानक होता की, दुचाकीचा पूर्णपणे चक्काचूर झाला.

सदर घटनेची माहिती मिळताच चुडावा पोलिस ठाण्याचे ठाणेदार सुषांत किनगे, फौजदार अरुण मुखेडकर आणि जमादार हिरक जैन यांच्यासह पोलिस पथकाने घटनास्थळी धाव घेतली. पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेण्यात आला आणि शवविच्छेदनासाठी पुर्णा ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आला. त्यानंतर मृतदेह नातेवाइकांच्या ताब्यात देण्यात आला. या घटनेची नोंद चुडावा पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

कुटुंबावर दुखाचा डोंगर मुंजाजी यांच्या पश्चात आई–वडील, लहान भाऊ, पत्नी आणि अवघ्या चार दिवसांची चिमुरडी मुलगी असा मोठा परिवार आहे. विशेष म्हणजे, चार दिवसांपूर्वीच त्यांच्या घरी कन्यारत्नाचा जन्म झाला होता. मात्र, बापाने आपल्या मुलीला डोळे भरून पाहण्याआधीच या दुर्दैवी घटनेने कुटुंबातील आनंदाला काळीमा फासली. मुंजाजी हे पंचायत समिती अधिकारी विठ्ठल सुदामराव क–हाळे यांचे मोठे बंधू होते. बुधवारी दुपारी भाटेगाव येथे शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

या दुर्घटनेमुळे भाटेगाव आणि पुर्णा परिसरात शोककळा पसरली आहे. स्थानिकांनी या घटनेबाबत तीव्र दुख व्यक्त केले असून, रस्त्यावरील वाहनांच्या बेफाम वेगामुळे अशा घटना वारंवार घडत असल्याची खंत व्यक्त केली आहे.

## कु. दर्शना चवडेचा नेट उत्तीर्ण झाल्याबद्दल जैन वाचनालयाने केला सन्मान

(संतोष तायडे /दै.धर्मयोध्दा)

**बोरी -** येथील दर्शना मनोजकुमार चवडे हिने राष्ट्रीय पात्रता चाचणी (नेट) या परिक्षेत भारतात ४४ व्या क्रमांकाने साहाय्यक प्राध्यापक पदासाठी पात्रता मिळवलेली असून यापूर्वी तिने महाराष्ट्र राज्यस्तरीय पात्रता परिक्षा (सेट ) मलाइफ सायन्सेसफ या विषयात उत्तीर्ण झाली आहे. या यशाबद्दल तिचे कै.जयकुमारजी जैन सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने शाल, पुष्पगुच्छ व ग्रंथभेट देऊन वाचनालयाच्या अध्यक्षा सौ.मीना जैन,व ग्रंथपाल नेमिनाथ जैन यांनी सत्कार केला.



यावेळी मनोज चवडे, मनीषा चवडे, दीप्ती वायकोस यांची उपस्थिती होती. कु.दर्शनाने अभियांत्रिकी पदवीधर अभियोग्यता चाचणी (GTE) बायोटेकनॉलॉजी या परिक्षेत भारतातून ४३६ हा मानाचा क्रमांक मिळवलेला आहे. दर्शना हिने तिचे चडल मायक्रोबायोलॉजीचे शिक्षण स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा युनिवर्सिटी नांदेड येथे प्रथम क्रमांकाने पास झाली असून तिने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पी.एच.डी पात्रता परिक्षा (पेट) सुद्धा उत्तीर्ण झाली आहे. दर्शनाने कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यासाने हे यश संपादन केले आहे. तिच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. आपल्या यशाचे संपूर्ण श्रेय ती आपल्या आई–वडील, स्वा रा ती म विद्यापीठातील शिक्षक तसेच खत्र्ड एज्युकेशन टीम ला दिले आहेत. जैन वाचनालयाच्या वतीने तिच्या पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा....



**जिंतुर– येथील श्री कम्प्युटर जिंतूर तर्फे शिक्षक दिनानिमित्त संत नामदेव विद्यालय अबरवाडी जिंतूर येथील मुख्याध्यापक अरुण घुगे तसेच सर्व शिक्षकांचा सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष अरुण घुगे सर, श्री कॉम्प्युटर संचालक संतोष चौधरी, पत्रकार सचिन रायपत्रीवार, के.डी.राऊत, दीपक घुगे, कृष्णा घुगे तसेच सर्व प्राध्यापक उपस्थित होते.**


**टि.सी. हरवली आहे**

**माझी अविनाश बंडु तोंडे या नावाची१२वी पासची टीसी , आधार कार्ड ,डोमासाईल झेरॉक्स ,नांदेड ते बीड प्रवासात हरवली आहे. कोणाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा.**

**-: संपर्क :-**

**अविनाश बंडु तोंडे**
**श्रीरामपुर वस्ती ता .पाथरी मो.नं. ७३७८९६५३९२**

**टि.सी. हरवली आहे**

**माझी उमेश बप्पाजी बिक्कड या नावाची १२ वी पासची टी.सी,कास्ट प्रमाणपत्राची झेरॉक्स ,आधार कार्ड , डोमासाईल झेरॉक्स बीड ते पाथरी प्रवासात हरवली आहे. कोणाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा.**


**-: संपर्क :-**

**.ऊमेश बप्पाजी बिक्कड**
**श्रीरामपुर वस्ती ता .पाथरी मो.नं. ८८५५०१५०८७**


## पूर्णा येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त व्याख्यानमालेचे आयोजन

(असद शेख/दै.धर्मयोध्दा)

**पुर्णा -** स्वातंत्र्य सैनिक सूर्यभानजी पवार महाविद्यालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिन व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या वर्धापन दिनानिमित्त ११ ते १९ सप्टेंबर २०२५ या कालावधीत सप्ताह साजरा करण्यात येत आहे. या उपक्रमाचा भाग म्हणून दिनांक १५ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता महाविद्यालयाच्या सभागृहात हैदराबाद मुक्तिसंग्राम समजून घेताना या विषयावर परभणी येथील प्रख्यात व्याख्याते सुभाष ढगे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.



या व्याख्यानमालेत परभणी जिल्ह्यातील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत येणाऱ्या वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी तसेच परिसरातील नागरिकांनी सहभागी होऊन या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. रामेश्वर पवार, अध्यक्ष गुलाबराव कदम, प्रभारी प्राचार्य डॉ. संतोष कुर्हे, सांस्कृतिक प्रभारी डॉ. शारदा बंडे आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. भीमराव मानकरे यांनी केले आहे. हा कार्यक्रम मराठवाड्याच्या स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासाला उजाळा देण्यासाठी आयोजित करण्यात आला आहे.

## पूर्णा येथील श्री गुरुबुद्धीस्वामी महाविद्यालयाच्या फुटबॉल संघाने पटकावले जिल्हास्तरीय विजेतेपद

**पाथरी-** परभणी येथे आयोजित जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत पूर्णा येथील श्री गुरुबुद्धीस्वामी महाविद्यालयाच्या फुटबॉल संघाने अंतिम सामन्यात दमदार कामगिरी करत विजेतेपद पटकावले. या यशासह संघाने छत्रपती संभाजीनगर येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी आपली जागा पक्की केली आहे. महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने ८ सप्टेंबर रोजी परभणी येथे ही स्पर्धा पार पडली. प्रशिक्षक प्रा. सतीश बरकुंटे यांच्या मार्गदर्शनाखाली नवोदित खेळाडूंनी पहिल्या फेरीपासूनच उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत अंतिम फेरीत सांघिक समन्वयाने मैदानावर वर्चस्व गाजवले. विजेत्या संघात वेदांत मंण्यालिकर, प्रथमेश अहिरे, सय्यद हमजा, रोहन हटकर, प्रणय लोखंडे, शिवराजसिंह ठाकूर, किशोर दुंडिनर, यश चित्ते, यश खंडागळे, नकुल राजभोज, शब्द खंडागळे, सुमेध वाव्हळे, संकेत हटकर, सम्यक इंगळे, मोहम्मद कैफ, अवनीश एकलारे, यादव हर्षवर्धन आणि श्रीनाथ वैद्य यांचा समावेश होता.



महाविद्यालयाच्या वतीने संस्थेचे कार्याध्यक्ष प्रमोद अण्णा एकलारे, सचिव अमृतराज कदम, सहसचिव प्रा. गोविंदराव कदम, प्राचार्य डॉ. के. राजकुमार, उपप्राचार्य डॉ. शिवसाब कापसे, डॉ. गजानन कुरूंदकर, पर्यवेक्षक उमाशंकर मिटकरी, उपप्राचार्य चारुदत्त डाफणे, कार्यालयीन अधीक्षक बाळासाहेब कुलकर्णी यांच्यासह सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. संघाच्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत असून, आगामी विभागीय स्पर्धेसाठी खेळाडूंना शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

## शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा



(संतोष तायडे/दै.धर्मयोध्दा)

**बोरी –** शिक्षक दिनानिमित्त शिक्षकांचा गौरव करण्यासाठी कौसडीच्या प्रशाला कौसडी केंद्रीय प्राथमिक शाळा कौसडी कन्या कौसडी प्राशा उर्दू कौसडी या चार शाळेच्या व्यवस्थापन समितीने एकत्र येऊन शिक्षकांसाठी सत्काराच्या कार्यक्रमाचे आयोजन केले या कार्यक्रमांतर्गत चारही शाळेचे सर्व शिक्षक शिक्षिका लिपिक सेवक तसेच खिचडी शिजवणाऱ्या ताई या सर्वांचा पुष्पहार व शाल देऊन सत्कार विद्यार्थ्यांच्या हस्ते करण्यात आला शिक्षकांचा सत्कार करण्यासाठी विद्यार्थ्यांची निवड अनोख्या पद्धतीने करण्यात आली सर्व विद्यार्थ्यांना डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन महात्मा ज्योतिबा फुले सावित्रीबाई फुले तसेच संविधान या विषयाव माधव खरात व भालेराव सर यांनी प्रश्न विचारून निवड केली व निवड झालेल्या विद्यार्थ्यांकडून आपल्या गुरुजनांचा सन्मान करण्यात आला तसेच शिक्षक दिनाचे औचित्य साधून सर्व पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांना नाष्टा देण्यात आला हा कार्यक्रम पार पाडण्यासाठी समितीचे अध्यक्ष रमेश बारवकर माधव खरात अन्वर बेग तसेच सदस्य सौ अनिता खैरे सौ लगड ताई दत्ता काळे सुनील कसाबकर महेश गिरगावकर यांनी परिश्रम घेतले तसेच कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक सर्व शिक्षक शिक्षिका प्रांगणामध्ये उपस्थित होते

# पुर्णा तालुक्यात खुनाची मालिका कायम!

## पतीने पत्नीचा काठीने मारहाण करत गळा दाबून केला खून

(असद शेख/दै.धर्मयोध्दा)

**पुर्णा-** तालुक्यात गेल्या दीड महिन्यांपासून खुनाच्या घटनांनी थैमान घातले आहे. कायद्याचा धाक कमी होत असल्याची भावना नागरिकांमध्ये पसरली असताना, ताडकळस पोलिस ठाण्याच्या हद्दीतील बलसा गावात ८ सप्टेंबर रोजी सकाळी आणखी एका निर्घृण खुनाने परिसरात खळबळ उडाली आहे. बलसा येथील देविदास माणिकराव शिंदे (वय ५०) याने किरकोळ कारणावरून आपली पत्नी



सुनिताबाई देविदास शिंदे (वय ४५) यांचा खून केला. पत्नीने दुध सांडविल्याच्या कारणावरून झालेल्या वादातून संतापलेल्या देविदासने शेत गट क्रमांक ७७ येथे सुनिताबाईंना काठीने बेदम मारहाण केली आणि नंतर गळा आवळून त्यांचा जीव घेतला. या घटनेची तक्रार मयत सुनिताबाईंचा मुलगा सुरेश देविदास शिंदे (वय २५, व्यवसाय मजुरी, रा. बलसा, मूळ गाव बरबडी) याने ताडकळस पोलिस ठाण्यात नोंदवली. त्यानुसार, आरोपी देविदास शिंदेवर भा.द.वि. संहिता कलम १०३(१) अंतर्गत गुन्हा नोंद क्र. २३१/२०२५ दाखल करण्यात आला आहे. सपोनि गजानन मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पेउपनि काठेवाडे यांच्याकडे तपासाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

पुर्णा तालुक्यात गेल्या काही दिवसांत चुडावा पोलिस हद्दीतील धनगर टाकळी फाटा आणि हिवरा (बु), ताडकळस हद्दीतील कळगाव, तसेच पुर्णा पोलिस ठाण्याच्या झिरोफाटा आणि कोळीवाडा धनगर गल्ली भागात सलग सहा खुनाच्या घटना घडल्या आहेत. आता बलसा येथील या सातव्या खुनाने तालुक्यातील कायदा–सुव्यवस्था धोक्यात आल्याची तीव्र भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. या सत्राने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, कायदा–सुव्यवस्थेची परिस्थिती नियंत्रणात आणण्याची मागणी होत आहे.

ताडकळस पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला असून, आरोपीला अटक करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. या घटनेमुळे बलसा गावासह संपूर्ण तालुक्यात संताप आणि अस्वस्थता पसरली आहे.


दैनिक धर्मयोध्दा हे पत्र मुद्रक, प्रकाशक व मालक शिंदे रामेश्वर गणपतराव यांनी प्रविण प्रिटींग प्रेस शॉप नं.१४ सुपर मार्केट, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथे छापून धर्मयोध्दा कार्यालय, विकास नगर, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथुन प्रसिध्द केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या मजकुराशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही, या अंकाबाबतीचे वाद परभणी न्याय कक्षेत चालतील. **संपादक–शिंदे रामेश्वर गणपतराव**

DHARMA YODDHA Daily Publisher, Printer, Owner by- Shinde Rameshwar Ganpatrao, Printed at Pravin Printing press Shop No 14 Super Market Karegaon Road Parbhani 431401 (M.S) And Published A√t Dharmayoddha Karyalaya Vikas Nagar,Karegaon Road Parbhani. 431401 (M.S) Editor By - Shinde Rameshwar Ganpatrao

# जालना येथे राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचा कार्यकर्ता मेळावा संपन्न शेतकरी व जनतेच्या प्रश्नांवरुन सरकारवर हल्लाबोल

(प्रविण जगताप/ दै.धर्मयोध्दा)

**जालना** - राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा भव्य कार्यकर्ता मेळावा मंगळवार (दि.०९ रोजी) जालना येथे उत्साहात पार पडला. प्रदेशाध्यक्ष आ.शशिकांत शिंदे व महिला प्रदेशाध्यक्षा सौ. रोहिणीताई खडसे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या मेळाव्याला जिल्ह्यातील हजारो कार्यकर्ते व पदाधिकारी उत्स्फूर्त प्रतिसाद देत उपस्थित राहिले.




मेळाव्यात कार्यकर्त्यांना संबोधित करताना आ.शिंदे यांनी जनतेचा विश्वास आणि कार्यकर्त्यांची ताकद याच जोरावर सत्ता मिळवण्याचे आवाहन केले. तुम्ही मला साथ द्या, मी तुम्हाला सत्ता देतो, असे ठणकावून सांगताना त्यांनी सुभाषचंद्र बोस आणि महात्मा गांधींच्या आंदोलनांचा दाखला देत भारतातही लवकरच अन्यायाविरुद्ध अहिंसेची क्रांती होईल, असा विश्वास व्यक्त केला. ते पुढे म्हणाले की, निवडणुका लोकशाहीच्या मार्गाने न होता सत्ताधाऱ्यांच्या यंत्रणांच्या जोरावर होत आहेत. मात्र लोकशाहीने निवडणूक झाली तर सामान्य कार्यकर्ता देखील इतिहास घडवू शकतो. नेपाळमधील क्रांतीचा दाखला देत त्यांनी तरुणाईला अन्यायाविरुद्ध लढण्याचे आवाहन केले.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर भाष्य करताना आ.शिंदे म्हणाले, सोयाबीन, कापूस व तुरीला भाव नाही, शेतकरी बिकट परिस्थितीत आहे. मे महिन्यापासून सातत्याने पाऊस पडत आहे तरीही सरकारने ओला दुष्काळ जाहीर केलेला नाही. १५ सप्टेंबरला नाशिक येथे शेतकऱ्यांचा मोठा मेळावा होणार असून, मुख्यमंत्री यांना ओला दुष्काळ जाहीर करण्याचे निवेदन देण्यात येईल, अशी माहिती त्यांनी दिली.

आज आपण आवाज उठवला नाही तर हुकूमशाहीचा धोका वाढेल. क्रांती जालन्यातून सुरू होऊ द्या, विचारांची क्रांती जालन्यातून उभारूया, असे सांगत त्यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना आगामी लढाईसाठी सज्ज राहण्याचे आवाहन केले.

या मेळाव्याला माजी मंत्री राजेश टोपे, माजी आमदार चंद्रकांत दानवे, माजी आमदार संजय वाघचौरे, युवक जिल्हाध्यक्ष कपिल आकात, जिल्हाध्यक्ष डॉ. निसार देशमुख, ओबीसी प्रदेश कार्याध्यक्ष संजय काळबांडे, किसान सेल अध्यक्ष जगन्नाथ काकडे, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष फारुख शेख, महिला जिल्हाध्यक्ष सुरेखाताई लहाने यांच्यासह पदाधिकारी व मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

# बंजारा समाजाला एसटी दर्जा द्या; पांगरी बु. ग्रामपंचायतीची राज्य सरकारकडे मागणी



**मंठा-** महाराष्ट्रातील बंजारा समाजाला अनुसूचित जमाती (डढ) दर्जा मिळावा, या मागणीसाठी पांगरी बु. ग्रामपंचायतीकडून शासनाला निवेदन देण्यात आले आहे.

ग्रामपंचायत सरपंच मुकेश एकनाथ राठोड व ग्रामपंचायत सदस्यांच्या उपस्थितीत शासनाकडे पाठविण्यात आलेल्या या निवेदनात म्हटले आहे की, बंजारा समाज शतकानुशतके सामाजिक, शैक्षणिक व आर्थिकदृष्ट्या मागासलेला असून आजही हा समाज तांडा वस्त्यांमध्ये राहत आहे. शिक्षणापासून वंचित आहे. आरोग्य व मुलभूत सुविधा नसल्याने मोठ्या अडचणीत हा समाज जीवन जगतो.

निवेदनात पुढे नमूद केले आहे की, तेलंगणा व आंध्र प्रदेश राज्यांमध्ये बंजारा समाजाला अनुसूचित जमाती (डढ) दर्जा मिळाला आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्रातही बंजारा समाजाला तत्काळ एसटी दर्जा द्यावा, हीच आमची प्रखर मागणी आहे.

दरम्यान, जिंतूर (जिल्हा परभणी) येथे बंजारा समाजाचे कार्यकर्ते विनोद आडे हे हैद्राबाद गॅजेटियरनुसार बंजारा समाजाला एसटी प्रवर्गात समाविष्ट करण्याबाबत तात्काळ शासन निर्णय व्हावा, या मागणीसाठी आमरण उपोषण करीत आहेत. या आंदोलनाला सरपंच मुकेश राठोड यांनी प्रत्यक्ष जाऊन भेट देत पाठींबा दर्शवला.

ग्रामपंचायत पांगरी यांच्या तर्फे राज्य सरकारने या मागणीला तातडीने सकारात्मक प्रतिसाद द्यावा, अशी विनंती निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# जनसुरक्षा कायद्याविरोधात जालना येथे महाविकास आघाडीचे धरणे आंदोलन




(प्रविण जगताप/ दै.धर्मयोध्दा)

**जालना** – जनसुरक्षा कायदा रद्द करण्याच्या मागणीसाठी जालना येथे इंडिया व महाविकास आघाडीतील समविचारी पक्ष व संघटनांनी खा. कल्याण काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत जोरदार धरणे आंदोलन केले. या आंदोलनानंतर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले.

आंदोलनकर्त्यांनी शासनाने लागू केलेला जनसुरक्षा कायदा हा लोकशाहीला बाधा आणणारा व अभिव्यक्ती स्वातंत्र्याला मारक असल्याचा आरोप केला. लोकशाहीत विरोध हा स्वाभाविक आहे आणि त्यातूनच लोकशाही अधिक मजबूत होते. त्यामुळे लोकभावना लक्षात घेऊन शासनाने हा कायदा तातडीने मागे घ्यावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी यावेळी केली.

या धरणे आंदोलनास मा.आ. राजेश टोपे, जिल्हाअध्यक्ष राजाभाऊ देशमुख, शिवसेना जिल्हाप्रमुख भास्कर आंबेकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष निसार देशमुख, राजेंद्र राख, कॉ. आण्णा सावंत, बबलू चौधरी यांच्यासह विविध पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आंदोलनादरम्यान सरकारविरोधी घोषणाबाजी करण्यात आली. नागरिकांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करणारा हा कायदा त्वरित मागे घ्यावा, या ठाम भूमिकेसह महाविकास आघाडीने आपला निषेध नोंदवला.



**जालना – येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) जालना जिल्ह्याच्या मेळाव्यानिमित्त प्रदेशाध्यक्ष आ.शशिकांत शिंदे यांचे पहिल्यांदा आगमन झाले. या निमित्ताने, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जालना जिल्हाध्यक्ष डॉ निसार अहमद देशमुख यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी शहरअध्यक्ष नंदकिशोर जागंडे, उपाध्यक्ष तय्यब देशमुख आणि धनंजय देशमुख उपस्थित होते.**

# अंबड तालुक्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना वेतन मिळत नसल्याने आंदोलनाचा इशारा

## ग्रामसेवक व गटविकास अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत असल्याचे युनियनकडून करण्यात आला आरोप

(रामदास पाटेकर/ दै.धर्मयोध्दा)

**अंबड**–अंबड तालुक्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना मार्च २०२५ ते ऑगष्ट २०२५ या पाच महिन्यांपासून पगार मिळत नाही. आणि ग्रामसेवक तसेच गटविकास अधिकारी यांना वारंवार मागणी करण्यात येऊनही थकीत वेतन मिळत नसल्याने उपासमारीची वेळ आली आहे.त्यामुळे थकीत पगार, भविष्यनिर्वाह निधी तसेच राहणीमान भत्ता व कोरोना काळातील प्रोत्साहन भत्ता देण्यात यावा अशी मागणी महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी युनियनच्या वतीने गटविकास अधिकारी ज्योती कवडदेवी यांच्याकडे करण्यात आली आहे. सदर मागण्या सात दिवसांच्या आत पूर्ण न झाल्यास दि.१८ सप्टेंबर रोजी अंबड पंचायत समिती येथे बेमुदत उपोषण करण्याचा इशारा युनियनच्या वतीने देण्यात आला आहे.

यावेळी अंबड तालुकाध्यक्ष सुदर्शन नागरे,सचिव श्रीराम टेकाळे, जिल्हा संघटक सुनील गायकवाड, तालुका उपसचिव अशोक शिंदे, दिलीप जाधव, योगेश उघडे, युनूस सय्यद, गोकुळ खरात, कृष्ण मंडलिक, सुभाष जायभाये आदींची उपस्थिती होती.

# जालन्यात अल्पवयीन वाहन चालकांवर कारवाई : एकाच दिवशी २०९ वाहनांना दंड



(प्रविण जगताप/ दै.धर्मयोध्दा)

**जालना**– शहर व जिल्ह्यात अल्पवयीन मुलांकडून वाहन चालवण्याच्या वाढत्या प्रकारांवर अंकुश ठेवण्यासाठी वाहतूक विभाग व पोलिस प्रशासनाने सोमवारी विशेष मोहीम राबवली. या मोहिमेत तब्बल २०९ अल्पवयीन वाहन चालकांना पकडत ६ लाख ३८ हजार १०० रुपयांचा दंड ठोठावण्यात आला.

अल्पवयीन चालकांमुळे होणारे अपघात, जीवितहानी तसेच वाहतुकीत होणारी गैरसोय यावर नियंत्रण आणण्यासाठी जिल्हा पोलिस अधीक्षक अजय कुमार बन्सल व अपर पोलिस अधीक्षक आयुष नोपाणी यांच्या मार्गदर्शनाखाली मोहिमेचे समन्वयक म्हणून शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरिक्षक प्रताप इंगळे यांना नेमण्यात आले होते. शहरातील प्रमुख चौक, महत्त्वाचे रस्ते, शाळा व कॉलेज परिसरात ही मोहीम मोठ्या प्रमाणावर पार पडली.

वाहन चालकांकडे कागदपत्रांची तपासणी करून अल्पवयीन असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर संबंधित मुलांच्या मोटार वाहनांचे जप्ती आदेश काढण्यात आले. यासोबतच पालकांना थेट पोलिस ठाण्यात बोलावून कठोर इशारा देण्यात आला. मुलांना वाहन देणे हा कायद्यानुसार गुन्हा असल्याचेही पालकांना समजावण्यात आले.

वाहतूक शाखेचे अधिकाऱ्यांनी सांगितले की, अल्पवयीन चालकांमुळे अपघातांचे प्रमाण वाढत असून, पालकांनी जबाबदारी न घेतल्यास गंभीर परिणाम भोगावे लागतील. यापुढेही अशी मोहीम राबवून कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला.

# हैद्राबाद गॅझेटियरच्या आधारे बंजारा समाजाला एसटी दर्जा द्यावा - आमदार लोणीकर यांची मागणी

(विजय राठोड/ दै.धर्मयोध्दा)

**परतुर** - आमदार व माजी मंत्री बबनराव लोणीकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून मराठवाड्यातील बंजारा (लमाण/सुगळी) समाजाला अनुसूचित जमाती (एसटी) दर्जा द्यावा, अशी मागणी केली आहे.



लोणीकर यांनी पत्रात नमूद केले की, हैद्राबाद स्टेट गॅझेटियर १९२० मध्ये बंजारा समाजाचा अनुसूचित जमातीत स्पष्ट उल्लेख आहे. निजामकालीन हैद्राबाद राज्याचा भाग असलेल्या मराठवाड्यात त्यांच्या मोठ्या वस्त्या असल्याचेही गॅझेटियरमध्ये नमूद आहे. तथापि, महाराष्ट्रात १९५६ नंतर त्यांना ओबीसी व व्हीजेएनटी प्रवर्गात टाकण्यात आले, तर तेलंगणा व आंध्र प्रदेशात त्याच गॅझेटियरच्या आधारे त्यांना एसटी दर्जा मिळाला आहे.

लोणीकर यांनी लक्षात आणून दिले की, २ सप्टेंबर २०२५ रोजी सरकारने हैद्राबाद गॅझेटियरच्या आधारे मराठा समाजाला कुणबी (ओबीसी) आरक्षण दिले. त्याच धर्तीवर बंजारा समाजालाही एसटी दर्जा देऊन शिक्षण, नोकरी व विकास योजनांमध्ये ७% आरक्षणाचा लाभ द्यावा.

जालना, बीड, नांदेड आदी जिल्ह्यांत बंजारा समाजाची मोठी लोकसंख्या असून शासनाने गॅझेटियर उताऱ्यांची पडताळणी करून केंद्र सरकारच्या जनजाती मंत्रालयाकडे प्रस्ताव पाठवावा, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

# जालना जिल्हा सरचिटणीसपदी ॲड.अमोल लहाने – पक्षनिष्ठेचा विजय




(सुजीत लाहने/दै.धर्मयोध्दा)

**अंकुशनगर** – सुजित लहाने अंकुशनगर – गेली आठ वर्षे युवक तालुका अध्यक्ष म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाची निष्ठेने सेवा करणारे ॲड.अमोल लहाने यांना पक्षाने नवी जबाबदारी सोपवली आहे. पक्ष संघटनेतील प्रशासकीय व धोरणात्मक निर्णयांच्या अनुशंगाने प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे व माजी मंत्री राजेश टोपे, जिल्हाध्यक्ष निसार देशमुख व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत त्यांची जालना जिल्हा सरचिटणीसपदी निवड करण्यात आली.

ॲड.लहाने हे अनेक वर्षांपासून राजेश टोपे यांचे विश्वासू सहकारी आहेत. मराठा आरक्षण चळवळीमध्ये सुद्धा त्यांनी मनोज जरांगे पाटील यांच्या समवेत विवीध महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडल्या. इतर सामाजिक कार्यातही त्यांचा नेहमीच पुढाकार राहिला आहे. त्यांच्या या नियुक्तीमुळे पक्षाच्या जालन्यातील संघटनात्मक कार्याला अधिक वेग मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# 'अमृत' तर्फे विद्यार्थ्यांसाठी मोफत उद्योजकता परिचय कार्यशाळा : स्वावलंबनाचा मार्ग सुकर

(प्रविण जगताप/ दै.धर्मयोध्दा)

**जालना–** श्रीमती दानकुंवर महिला महाविद्यालय, जालना येथे महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), पुणे आणि उद्योग संचालनालय अंतर्गत कार्यरत महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (चउएऊ) यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी विशेष मोफत उद्योजकता परिचय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.




या कार्यशाळेत वेबिनारद्वारे अमृतच्या विविध योजनांची माहिती देण्यात आली. अमृतचे जिल्हा व्यवस्थापक श्री. अक्षय लंबे यांनी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण योजनांची सविस्तर माहिती दिली. तर सौ. वैशाली कुलकर्णी (सहाय्यक एम.सी.ई.डी. जालना) यांनी स्वयंरोजगार योजनेअंतर्गत राबवल्या जाणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली.

या प्रशिक्षणांतर्गत अमृत- सौरमित्र, अमृत- बेकरी, अमृत- आयात- निर्यात, अमृत- निवासी उद्योजकता विकास प्रशिक्षण (ठएऊझ) असे निवासी अभ्यासक्रम तसेच उद्योजकता विकास प्रशिक्षण (२१ दिवस), तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण (३० दिवस) आणि क्षमता बांधणी प्रशिक्षण (६ दिवस) असे अनिवासी अभ्यासक्रम राबविण्यात येणार आहेत.

तांत्रिक प्रशिक्षणासह व्यवसाय सुरू करण्यासाठी लागणारे आर्थिक, व्यवस्थापकीय, कायदेशीर मार्गदर्शन, मार्केटिंग कौशल्य, शासनाच्या विविध योजना, बँकिंग प्रकल्प अहवाल तयार करण्याची माहिती तज्ज्ञांकडून दिली जाणार आहे. प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर एम.सी.ई.डी.मार्फत व्यवसाय उभारणीसाठी पाठपुरावा आणि मोफत मार्गदर्शन उपलब्ध होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

या कार्यक्रमासाठी प्रा. डॉ. विद्याताई पटवारी, प्राचार्य श्री. जितेंद्र अहिरराव, श्री. विजय नागोरी, अमृत मित्र सत्यम अग्रवाल, अमृत सखी अश्विनी देहडकर यांचे विशेष सहकार्य लाभले. तर अंजू कुलकर्णी व अंकिता भटी यांनी विशेष प्रयत्न केले.

या उपक्रमामुळे युवक-युवतींना रोजगारनिर्मितीची मोठी संधी उपलब्ध होणार असून स्वावलंबी होण्यासाठी योग्य दिशा मिळणार आहे.


# शिवकालीन युध्दकला प्रशिक्षण शिबीरास उत्स्फुर्त प्रतिसाद , धोपटेश्वर येथील श्रीमती मैनामायी माध्यमिक विद्यालयात मुलींना मोफत प्रशिक्षण




(नवनाथ गव्हाणे/ दै.धर्मयोध्दा)

**बदनापुर–** धोपटेश्वर येथील श्रीमती मैनामायी माध्यमिक विद्यालयात शिवकालीन युद्धकला प्रशिक्षण शिबिराला उत्साहपूर्ण सुरुवात झाली आहे. या शिबिरात मुलींना लाठीकाठी, तलवारबाजी, कराटे, दांडपट्टा, दंडसाखळी यांसारख्या पारंपरिक तसेच आधुनिक युद्धकलांचे मार्गदर्शन केले जात आहे.

या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे शरददादा पाटील स्वतः प्रशिक्षक म्हणून मुलींना हे प्रशिक्षण पूर्णपणे निशुल्क देत आहेत. मुलींच्या अंगी शौर्य, आत्मविश्वास आणि स्वसंरक्षणाची तयारी निर्माण व्हावी, तसेच शिवकालीन परंपरेचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचावा हा उद्देश या उपक्रमामागे आहे.



शिवकालीन युद्धकला ही आपल्या परंपरेचा वारसा आहे. मुलींनी हे शस्त्र शिकणे म्हणजे त्यांच्या आत्मरक्षणाबरोबरच आत्मविश्वास वाढवणे होय. लाठीकाठी, तलवारबाजी, दांडपट्टा यासारख्या शस्त्रकलेचे प्रशिक्षण घेतल्याने मुली शारीरिक व मानसिकदृष्ट्या सबळ होतात. संकटसमयी स्वतःचे रक्षण करण्याची क्षमता त्यांच्यात निर्माण होते. जिजाऊंच्या संस्कारातूनच स्त्री शक्तीला मिळाली शस्त्रकलेची ताकद. शिवरायांनी स्त्रीसुरक्षेला नेहमी प्राधान्य दिले तसेच आजच्या मुलींनीही या कलेद्वारे स्वतःला सक्षम बनवावे, हाच या शिबिरामागचा हेतू आहे. **– शरद दादा पाटील (प्रशिक्षक)**

विद्यार्थिनींमध्ये या शिबिराला उत्तम प्रतिसाद मिळत असून, त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासोबतच शिस्त, धैर्य व आत्मविश्वासाची जोपासना होत आहे. पालक आणि ग्रामस्थांनी या उपक्रमाचे मनःपूर्वक स्वागत केले आहे. या शिबिराचे आयोजन हे शाळेचे मुख्याध्यापक श्री देविदास बनकर सर, श्री शेजुळ सर, श्री देहडे सर व उत्कृष्ठ फोटोग्राफर आणि सामाजिक कार्यकर्ते सिद्धेश जी शेळके यांनी केले आहे तसेच मीडीया पार्टनर म्हणून दै धर्मयोध्दा वृत्तपत्र आहे.